# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२५
पृष्ठे ६८ | किंमत : रु. १५
वर्ष पंचविसावे
अंक पहिला



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

## पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२५ ◆ वर्ष पंचविसावे ◆ अंक पहिला

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

— *अनुक्रमणिका* —

**संपादकीय** ४
**विशेष लेख** १०
**पुरस्कार** १४
**प्रकाशन** १६
**पुस्तकाच्या पानांतून**
मॅन VS ओशन २०
ज्ञानसूर्याचे आकाश २४
उपचार तन-मनाचे ३८
माणसं अशी आणि तशीही ४४
ॲन आयलंड ५०
तवायफनामा ५६
**दिनविशेष** ६१

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## ग्रंथमय जगत

नवीन वर्षाची सुरुवात होत असताना डिसेंबर महिन्यात होऊन गेलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाच्या सुखद आठवणी मनात अजूनही रुंजी घालत आहेत. यंदाचे वर्ष हे पुणे पुस्तक महोत्सवाचे दुसरे वर्ष होते. गतवर्षीपेक्षा उच्चांकी विक्रमांची नोंद करत, सदर पुस्तक महोत्सव १४ डिसेंबर ते २२ डिसेंबर दरम्यान पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पाडला. या वर्षी वाचकांचा उदंड प्रतिसाद नजरेत भरण्यासारखा होता. यंदा पुस्तकांच्या स्टॉलची संख्या जवळपास ७०० इतकी होती. गतवर्षीच्या तुलनेत ही संख्या तिपटीने अधिक होती. राष्ट्रीय पुस्तक न्यास व पुणे पुस्तक महोत्सव यांचे असणारे नियोजन हे वाखाणण्याजोगे होते. हा महोत्सव यशस्वीपणे पार पडावा यासाठी कष्ट घेणारे बरेच लोक व संस्था यांचाही यामध्ये मोलाचा वाटा आहे.

अलीकडच्या काळात जी चर्चा बऱ्याचदा कानावर येत असते ‘वाचन आणि वाचक कमी झाले आहेत का?’ या चर्चेला पूर्णविराम देणारं असं चित्र या पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने पाहायला मिळालं. सकाळी ग्रंथमहोत्सव सुरू झाल्यापासून वाचकांची होणारी गर्दी, त्यातून होणारी पुस्तकविक्री हे चित्र निश्चितच आशादायक स्वरूपाचे आहे.



गतसालाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी ग्रंथविक्रीची विक्रमी उलाढाल यानिमित्ताने झाली, ही बाब साहित्य व प्रकाशन व्यवहाराला सुखावह ठरणारी आहे. साहित्यसंमेलने आणि त्यात भरवली जाणारी ग्रंथप्रदर्शने यावर दरवर्षी चर्चा होतच असते. त्या चर्चेचे नेमके फलित काय, याचा शोध आजही लागलेला नाही ही बाब नमूद करावीशी वाटते. या प्रकारचे 'पुस्तक महोत्सव' हे पर्यायी म्हणून लोकांच्या पसंतीस उतरत आहेत, ही बाबही दखल घेण्यासारखी आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यास व पुणे पुस्तक महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने भरवला गेलेला हा पुस्तक महोत्सव या वर्षी मुंबईसह नागपूर व नाशिक या शहरांमध्ये भरवला जाणार आहे. त्याची सुरुवात मुंबईत होणाऱ्या एप्रिल महिन्यातील पुस्तक महोत्सवाने होणार आहे. ही बाब महत्त्वाची म्हणावी लागेल. अशा प्रकारच्या पुस्तक महोत्सवांना होणारी गर्दी व त्यातून होणारी ग्रंथव्यवहाराची उलाढाल यासाठी असे महोत्सव देशभरात स्थानिक पातळीवर असणाऱ्या यंत्रणांना सोबत घेऊन, असे पुस्तक महोत्सव भरवले गेले पाहिजेत. पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक ग्रंथप्रेमी मा. राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे मा. युवराज मलिक, मा. मिलिंद मराठे यांचे व त्यांच्या संपूर्ण टीमचे पुणे पुस्तक महोत्सवाच्या यशस्वी नियोजनासाठी घेतलेल्या कष्टांबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!

जानेवारीत सातारा येथेही 'सातारा ग्रंथ महोत्सव' आयोजित केला जातो. यंदाचे वर्ष हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. साताऱ्यात गेली २५ वर्षे दरसाल हा ग्रंथमहोत्सव भरवला जातो. साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. चार दिवस हा ग्रंथमहोत्सव असतो. सातारा ग्रंथमहोत्सव हाही साहित्याला वाहिलेला ग्रंथमहोत्सव म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे. १० ते १३ जानेवारी दरम्यान हा महोत्सव पार पडणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साहित्यव्यवहारात या ग्रंथमहोत्सवाचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

आमच्या प्रकाशनसंस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार' या पुरस्काराचे वितरणही या महिन्यात १२ जानेवारी रोजी होत आहे. पुरस्काराचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. सुनील मेहता यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण केले

जाणार आहे. पदार्पणातील पहिली साहित्यकृती असणाऱ्या कादंबरी व कथासंग्रहाला हा पुरस्कार दिला जातो.

'मेहता मराठी ग्रंथजगत' या आमच्या मासिकाचेही यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. गेली चोवीस वर्षे सातत्याने साहित्य विषयाला वाहिलेले हे मासिक प्रसिद्ध होत आहे. या मासिकाने दरवर्षी नवनव्या विषयांवर संपादन केलेले दिवाळी अंकही वाचकांपर्यंत पोहोचवले. मेहता मराठी ग्रंथजगतच्या अनेक दिवाळी अंकांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'रत्नाकर पुरस्कार,' मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांचा 'उत्कृष्ट अंक पारितोषिक,' रोटरी क्लबतर्फे 'रोटरी लोकमान्य पुरस्कार,' नंदा फाउन्डेशनचा 'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार,' दिनमार्क पब्लिकेशनतर्फे 'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार' या पुरस्कारांचा समावेश आहे. यंदाच्या रौप्यमहोत्सवी वर्षातदेखील नावीन्यपूर्ण अंक घेऊन वाचकांच्या भेटीस येत आहोत.

मेहता पब्लिशिंग हाऊस ही मराठीतील एक अग्रगण्य प्रकाशनसंस्था म्हणून गणली जाते. गेली ४८ वर्षे सातत्याने साहित्य सेवेचे व्रत अविरतपणे सुरू आहे. यापुढील काळातदेखील ही साहित्यसेवा अशाच प्रकारे चालू राहील. २०२५ या वर्षातदेखील नवनव्या साहित्य प्रकल्पांसह आम्ही आपल्यासमोर नवीन पुस्तके घेऊन येणार आहोतच.

आमच्या सर्व वाचकांना, वितरकांना, हितचिंतकांना इंग्रजी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!

अखिल मेहता

## नवी संहिता... नवा आशय...

# हॉलिवूडचे विनोदवीर





**राजेन्द्र खेर**

हॉलिवूडच्या ब्लॅक-कॉमेडी जमान्यातील
विनोदवीरांची चरितकहाणी

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# द आर्ट ऑफ मॅनेजमेंट




**शिव शिवकुमार**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

व्यवस्थापन... तुमचे, तुमच्या टीमचे आणि तुमच्या उद्योगाचे

**किंमत : ३९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं


* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# विशेष लेख

## मराठीतील गृहपत्रिका

मराठीत प्रकाशन संस्था त्यांच्या-त्यांच्या प्रकाशन संस्थेच्या पुस्तकांची माहिती प्रसारित करण्यासाठी स्वतंत्र गृहपत्रिका (House Magzine) प्रकाशित करत आहेत. प्रकाशन संस्थेच्या पुस्तकांची जाहिरात व त्यासंबंधी लेखन वाचकापर्यंत पोहोचविण्यात या गृहपत्रिकांचा मोठा वाटा आहे. एका अर्थाने या गृहपत्रिका त्या-त्या प्रकाशन संस्थेची मुखपत्रे होत. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन वातावरणाला पोषक ठरतील असे काम या गृहपत्रिकांनी केले आहे. प्रकाशन संस्थेच्या पुस्तकांची माहिती प्रसिद्ध करणे, पुस्तकांविषयी लेख, परीक्षणे, प्रतिक्रिया, लेखक मुलाखती असे त्यांचे स्वरूप आहे. मराठीत अभिनव प्रकाशनाच्या वा. वि. भट यांनी 'संग्रहालय' (१९७७) ही गृहपत्रिका सुरू केली होती. तर लोकवाङ्मय गृह प्रकाशनाच्यावतीने आरंभी 'लोकवाङ्मय' नंतर 'लोकवाङ्मय वृत्त' व अलीकडे 'आपले वाङ्मय वृत्त' (संपादक म्हणून नारायण सुर्वे, सदा कऱ्हाडे व सतीश काळसेकर यांनी काम पाहिले.) प्रसिद्ध होत असे. पॉप्युलर प्रकाशनाच्या वतीने 'प्रिय रसिक', रोहन प्रकाशनाची, 'रोहन साहित्य मैफल' (संपा. प्रदीप चंपानेरकर) शब्दालयचे 'शब्दालय', मनोविकास प्रकाशनाचे 'इत्यादी'

ग्रंथालीचे वाचक चळवळचे ‘रुची’ या गृहपत्रिका प्रसिद्ध होतात. अलीकडे मनोविकास प्रकाशन हे ‘मनोविकास वर्ड्स’ हे डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध करते. यातील काही गृहपत्रिका अलीकडे बंद झाल्या आहेत. ‘आपले वाङ्मय वृत्त’च्या अंकात ‘प्रागतिक विचार आणि संस्कृतीला वाहिलेले नियतकालिक’ असे आरंभकाळात छापले जात असे. नंतर ‘वाचकांशी सांस्कृतिक संवाद साधणारे मासिक’ असे छापण्यात आले.

अगदी सुरुवातीच्या काळात मौज प्रकाशनाने ‘सत्यकथा’ व ‘मौज’ दिवाळी अंक ही मौज प्रकाशनगृहाची नियतकालिके सुरू केली; परंतु त्याचे स्वरूप पूर्णपणे वाङ्मयीन होते. मॅजेस्टिक प्रकाशनाचे ‘ललित’ हे मासिक आहे, त्याचेही स्वरूप वाङ्मयीन आहे. तसेच पुढील काळात ‘साधना’ व शब्द पब्लिकेशनचे ‘मुक्त शब्द’चे स्वरूपही असेच राहिले. या पत्रिकांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या-त्या प्रकाशन संस्थेच्या ग्रंथ प्रकाशनाविषयीच्या धोरणाचे प्रतिबिंब या पत्रिकांमधून पाहायला मिळते. ग्रंथसंस्कृतीतील संग्रहालय कार्यकर्त्यांचे ओळख करून देणारे ‘संग्रहालयाचे शिल्पकार’, ‘साहित्यिकांचे स्मृतिदिन लेख’, ‘पुस्तकांची कुळकथा’ अशी सदरे ‘संग्रहालय’ मधून प्रसिद्ध झाली. संग्रहालयने काही विशेषांक प्रसिद्ध केले. ग्रंथसंस्कृतीच्या प्रसारासाठी या गृहपत्रिकांचा उपयोग झाला आहे. ‘आपले वाङ्मय वृत्त’ मधून सामाजिक, वैचारिक स्वरूपाचे वाङ्मयविषयक लेखन प्रसिद्ध झाले. ‘आपले वाङ्मय वृत्त’ मधून ‘उत्खनन’, ‘समकाल’, ‘आडवाट’, ‘ग्रंथपरीक्षणे’, ‘वाचणाऱ्याची रोजनिशी’, कलामीमांसेवरील लेखन प्रसिद्ध झाले. ‘रोहन साहित्य मैफल’ मध्ये ‘मैफल संवाद’, ‘विशेष लेख’, ‘मैफल कट्टा’, ‘माझी निवड’, ‘परीक्षण’, ‘वृत्तान्त’, ‘पुस्तक परिचय’ असे विभाग आहेत. या गृहपत्रिकांनी वैशिष्ट्यपूर्ण असे दिवाळी अंक प्रसिद्ध केले आहेत. ‘आपले वाङ्मयवृत्त’ ने सतीश काळसेकर व प्रकाश विश्वासराव यांच्यावरील विशेषांक प्रसिद्ध केले. या गृहपत्रिकांमागे प्रकाशन संस्थांच्या व्यावसायिक दृष्टीचा भाग आहे. ग्रंथविक्रीस पूरक ठरेल असे या अंकांचे स्वरूप आहे. या अंकातील दृश्य मांडणीदेखील व्यावसायिक दृष्टिकोनातून केलेली दिसेल. अलीकडे या गृहपत्रिका डिजिटल स्वरूपात मोठ्या प्रमाणात प्रकाशित होतात. कोरोना काळात या अंकांचं प्रकाशन मोठ्या प्रमाणात झालं.

मेहता पब्लिशिंग हाऊसने २००० पासून ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ ही

गृहपत्रिका सुरू केली. शंकर सारडा हे दीर्घ काळ तिचे कार्यकारी संपादक होते. काही काळ योजना यादव यांनी संपादन साहाय्य केले व अलीकडे प्रतीक येतावडेकर हे संपादन साहाय्य करत आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची माहिती देणे या मुख्य हेतूबरोबर काही वाङ्मयीन सदरे सुरू केली. लेखक संवाद, वाङ्मयीन घडामोडी, परीक्षणे, प्रकाशन समारंभ, साहित्य संमेलन वृत्तान्त अशी सदरे चालविली. संपादकीय, दखल, साहित्यवार्ता, पुरस्कार, पुस्तक परिचय, अभिप्राय, इंग्रजी पुस्तक परिचय, चर्चेतील पुस्तक, श्रद्धांजली व बालनगरी असे ग्रंथजगतचे स्वरूप असे. भविष्यातील डिजिटल पुस्तकांची मागणी लक्षात घेता मेहता मराठी ग्रंथजगतचे काही वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंक प्रकाशित झाले. पत्र वाङ्मय, व्हर्च्युअल फॅन्टसी, तंत्रमाध्यमे व मराठी साहित्य, वाचनसंस्कृती इ. विषयांवर दिवाळी अंक प्रकाशित केले. निरंजन घाटे, रणजित देसाई, बालसाहित्य विशेषांक प्रसिद्ध केले.

सुनील मेहता व शंकर सारडा यांच्या कल्पनेतून 'मेहता मराठी ग्रंथजगत'ची निर्मिती झाली. आरंभी सुनील मेहता यांचे संपादक म्हणून अंकावर नाव होते. त्यानंतर आता अखिल मेहता यांचे नाव आहे. सुनील मेहता यांच्याकडे मेहता पब्लिशिंग हाऊसची जबाबदारी आल्यानंतर अनुवादित पुस्तकांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. त्याचे प्रतिबिंब अंकाच्या निर्मितीत उमटलेले दिसते. छोटेखानी आकाराच्या या अंकात मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांच्या जाहिराती, मेहता प्रकाशनाच्या लेखकांना वा साहित्यकृतींना मिळालेल्या पुरस्कारांची माहिती आहे. 'पुस्तकाच्या पानांतून' या मालेत मेहता प्रकाशनाच्या पुस्तकांची मुखपृष्ठे व प्रकरणांचा काही सारांश दिला जातो. व्यावसायिक दृष्टिकोनातून चालवलेली ही गृहपत्रिका आहे. लहान आकारातील ६८-७० पृष्ठांचा हा अंक आहे. बहुतांश वेळा अंकाची मुखपृष्ठे लेखकांच्या व पुस्तकांच्या छायाचित्रांनी सजलेली असतात. शंकर सारडा यांच्या संपादकीय दृष्टीची छाप या अंकावर होती. मेहता मराठी ग्रंथजगतची जबाबदारी सांभाळणाऱ्या शंकर सारडा यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जागवणारे लेख फेब्रु. २०२१ च्या अंकात आहेत. २०१३च्या अंकाचे संपादकीय 'डिजिटल पुस्तकांची वाढती बाजारपेठ' असे होते. आगामी पुस्तकांची माहिती तसेच ग्रंथविशेष लेख असतात. मेहता मराठी

ग्रंथ जगतच्या वाचक वर्गणीदारांसाठी खास सवलतीमध्ये ग्रंथखरेदीच्या जाहिराती असतात. वाङ्मयीन घडामोडींचा वाटाड्या म्हणून देखील मेहता ग्रंथजगतला विशेष महत्त्व आहे. तसेच मेहता प्रकाशनाच्या दीर्घकालीन वाटचालीचे व दृष्टिकोनाचे चित्र या अंकामधून पाहायला मिळते. तसेच त्या-त्या काळातील मराठी वाङ्मय संस्कृती व वाचन-संस्कृतीचा कानोसा देखील आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस हे नेहमीच त्या-त्या काळातील बहुसंख्य वाचकांशी निगडित राहिले आहे. समग्र लेखक, अनुवादित पुस्तके, डिजिटल साहित्य, विश्व साहित्यातील नव्या लेखकांचा शोध, हे या प्रकाशनाचे वैशिष्ट्य आहे. हे त्यांचे वैशिष्ट्य अधोरेखित करणारी ही गृहपत्रिका आहे.

**– प्रा. रणधीर शिंदे**

◆



# पुरस्कार

## साहित्य सृजन पुरस्कार


आपल्या प्रभावशाली कामगिरीनं मराठी प्रकाशन व्यवसायावर वेगळा ठसा उमटविणारे प्रकाशक सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या दुसऱ्या साहित्य सृजन पुरस्कारांची घोषणा झाली आहे. पांडुरंग पाटील लिखित 'नांगरमुठी' ही सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्काराची मानकरी ठरली असून, प्रसाद कुमठेकर लिखित 'इत्तर गोष्टी' सर्वोत्कृष्ट कथासंग्रहाचा मानकरी ठरला आहे.

प्रकाशक सुनील मेहता यांच्या अकाली निधनानंतर त्यांनी जोपासलेला साहित्यनिर्मितीचा वारसा कायम ठेवतच मेहता पब्लिशिंग हाऊसने उदयोन्मुख साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठीही प्रयत्न केले आहेत. यासाठी मागील वर्षीपासून प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कारांचे वितरण केले जाते. सर्वोत्कृष्ट कादंबरीसाठी रुपये तीस हजार आणि मानचिन्ह, तर सर्वोत्कृष्ट कथासंग्रहासाठी रुपये वीस हजार मानधनासह मानचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. १२ जानेवारी रोजी पुण्यातील सदाशिव पेठ येथील मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. ज्येष्ठ लेखक राजन गवस यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले, तर समीक्षक रणधीर शिंदे यांनी पुरस्कृत साहित्यकृतीसंबंधी

विवेचन केले.

प्रथम कादंबरी आणि प्रथम कथासंग्रह असा निकष असलेल्या या पुरस्कारासाठी ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ दरम्यान प्रकाशित पुस्तकांचा विचार करण्यात आला. यासाठी राज्यभरातून शंभरहून अधिक प्रवेशिका दाखल झाल्या होत्या. मराठीतील दिग्गज साहित्यिक, समीक्षकांकडून या प्रवेशिकांमधून पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली. त्या-त्या साहित्यप्रकारातील वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती आणि भविष्यातील लेखकाच्या प्रज्ञेच्या बीजरूपी आविष्काराची कृती म्हणून 'नांगरमुठी' आणि 'इत्तर गोष्टी' या पुस्तकांची निवड झाल्याचे निवड समितीने सांगितले. राज्यभरातील दर्जेदार साहित्यकृतींचा विचार करताना मेहता पब्लिशिंग हाऊसने सर्व प्रकाशनांसाठी ही संधी उपलब्ध केली आहे. 'नांगरमुठी' ही दर्या प्रकाशनाने प्रकाशित केली असून, 'इत्तर गोष्टी' हा पपायरस प्रकाशनाने प्रकाशित केलेला कथासंग्रह आहे.

## साहित्य अकादमी पुरस्कार




ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

सन २०२४साठीचा हा पुरस्कार 'विंदांचे गद्यरूप' या पुस्तकासाठी देण्यात आला.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक अभिनंदन.

◆

## प्रकाशन

### ‘छाटितो गप्पा’ कथासंग्रहातील पात्रं गप्पांच्या फडात प्रत्यक्ष अवतरली

मनाला साद घालणाऱ्या साध्या-साध्या घटना आणि वैदर्भीय भाषेचा गोडवा यांचा अनोखा मिलाफ असलेला कथासंग्रह ‘छाटितो गप्पा’ म्हणजे अनोखा गप्पांचा फडच.

दैनंदिन जगण्यातल्या साध्यासुध्या गोष्टी; पण त्यातही कधी-कधी जगण्याचं निर्मळ सूत्र जाणवून जातं. कधी-कधी वाचता-वाचता आणि हसताहसताच डोळ्यांच्या कडा ओलावून जातात. तर कधी आपल्याच आयुष्यातील पलटून गेलेल्या पानांची मन उजळणी करतं, असा हा जी.बी. देशमुखांचा अनोखा गोष्टींचा संग्रह. हाती घेतल्यावर खाली ठेवावासा वाटणार नाही असाच हा संग्रह. कुटुंबातल्या छोट्या-मोठ्या गमती असोत की, कार्यालयीन आयुष्यातल्या करामती, देशमुख हसवत, हसवत कोपरखळ्या मारत राहतात.

अमरावतीच्या वऱ्हाडभोळ्या वातावरणातील या हलक्याफुलक्या आणि मिश्कील कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ अनौपचारिक पद्धतीनं अमरावतीलाच एका अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनं करण्यात आला. या पुस्तकात अमरावतीच्या मणिबाई गुजराती हायस्कूलमधील लेखकाच्या शाळकरी जीवनातील घटनांचे, तेव्हाच्या सवंगड्यांचे मजेदार



संदर्भ वारंवार येतात. आता निवृत्तीच्या जीवनात प्रवेश केलेल्या त्याच सवंगड्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

मंगळवार दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी याच सवंगड्यांपैकी एक असलेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील ज्येष्ठ अधिव्याख्याते प्रा. निशिकांत काळे यांच्या पुढाकारातून हा सोहळा आकारास आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सांभाळले सुप्रसिद्ध सॉफ्ट स्किल ट्रेनर श्री. सुधीर मोरे आणि प्रमुख पाहुणे होते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तरुण, तडफदार प्राचार्य डॉ. आशिष महल्ले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नेटक्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास, आता विविध क्षेत्रांत प्रतिष्ठा-प्राप्त नागरिक म्हणून योगदान देत असलेले मणिबाई गुजराती हायस्कूल, अमरावतीचे माजी विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात याच शाळेच्या माजी विद्यार्थिनी असलेल्या सौ. मेघा ठाकरे-बोंदरे यांच्या सरस्वती वंदनेच्या सुश्राव्य गायनाने झाली. लेखकाच्या लहानपणापासूनच्या मिश्कील वृत्तीचा परिचय आपल्या सहज शैलीत प्रा. निशिकांत काळे यांनी करून दिला. पुस्तकाची ओळख करून देताना ॲड. प्रशांत यावले यांनी या पुस्तकातील खुमासदार कथांमधील वाचनीयतेच्या घटकाची प्रशंसा केली.

पुस्तकाची समीक्षा करणाऱ्या मणिबाई गुजराती हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी सौ. मनीषा वैद्य यांनी या कथांमधील मनोरंजकतेबरोबरच त्यातील भावस्पर्शी निष्कर्षांचा आवर्जून उल्लेख केला. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. आशिष महल्ले यांनी या कथासंग्रहाबाबत त्यांचे मत व्यक्त करताना,

आजच्या धकाधकीच्या जीवनात कशा पद्धतीनं जगायचं त्याचा आनंदी धडा जी. बी. देशमुखांनी या पुस्तकातून घालून दिला आहे, असे उद्गार काढले.

लेखक जी. बी. देशमुख यांनी त्यांच्या उद्बोधनात पुस्तकातील काही कथांमधील गमतींचा उल्लेख केला आणि 'पहिली हॅट्रिक' व 'अगा, जे घडलेची नाही' या दोन कथांचं अभिवाचन केलं, ज्याला श्रोत्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधीर मोरे यांनी भावस्पर्शी अशा 'गव्हातले खडे,' 'पुरणाची वेदना' आणि 'सुपरहिरो' या कथांचा उल्लेख केला आणि त्या कथांमधील मानवी भावभावनांच्या आंदोलनाचे कंगोरे उलगडून दाखवले.

कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन डॉ. प्रशांत यावले यांनी केले, तर आभारप्रदर्शन सौ. मनीषा देशमुख यांनी केले.

सर्वच वयोगटातील स्त्री-पुरुषांनी, शाळकरी विद्यार्थ्यांनी उत्साहात या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

# वेळेचं नियोजन करा तणावमुक्त व्हा

**रिटा एमेट**

अनुवाद

**जयंत गुणे**




वेळेचं करा नियोजन...
तणावांचं होईल उच्चाटन

**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...


# डॉ.टॉय्ज स्मार्ट प्ले स्मार्ट टॉईज

**स्टीव्हन ऑरबॅक**

अनुवाद

**प्रभाकर देवस्थळी**

विश्व खेळण्यांचे...
करी समृद्ध जीवन बालकांचे




**किंमत : ४३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**








अनुवाद

**श्याम भुर्के**

वेळेची छोटीशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर लाभ मिळवून देते.
कशी? वाचू या.

**किंमत : ४३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

## पुस्तकाच्या पानांतून




# मॅन vs ओशन

**ॲडम वॉकर** अनुवाद : **मोहन गोखले**

*सात समुद्री साहसं करतो एक टोस्टरविक्रेता...*
*त्या साहसांची थरारक, प्रेरणादायक गाथा*

### सुरुवातीची वर्षे

**अ**गदी लहानपणापासूनच एक प्रसिद्ध व्यावसायिक खेळाडू होण्याची चिन्हे माझ्यामध्ये कशी दृष्टोत्पत्तीस येत होती, मला जेमतेम दहावे वर्ष लागण्याआधीच मी कसा राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा जिंकत होतो आणि जलतरण या क्रीडा

प्रकारामध्येच माझे भवितव्य असल्याचे कसे स्पष्ट झाले होते, अशी ठोकळेबाज प्रकारची ही गोष्ट असणार नाहीये. सत्य एवढेच आहे की मी एक चांगला जलतरणपटू होतो. मला अनेक खेळांची आवड होती आणि त्यामध्ये गतीही होती.

अगदी लहानपणी मी तरणतलावाच्या तळाशी डोळे उघडे ठेवून बसायचो. मी आमच्या स्थानिक तरणतलावामध्ये असे करायचो आणि माझी आजी, नाना आणि आई मी बुडालो की काय, या भीतीने घाबरून जायचे. पाण्यात बुडालेल्या अवस्थेत राहणे मला आवडायचे– पाण्यावरच्या या जगापेक्षा मला त्या जगात शांतता मिळते. ते एक वेगळेच जग आहे आणि तेथील शांततेने मला एक प्रकारचा आनंद मिळतो.

थोडे मोठे झाल्यावर तरणतलावाच्या पायरीला धरून बुडालेल्या अवस्थेमध्ये किती वेळ श्वास रोखून धरू शकतो, हे मी बघायचो आणि दर खेपेला आधीच्या वेळेपेक्षा जास्त वेळ श्वास रोखून धरण्याचा माझा प्रयत्न असायचा. सुरुवातीपासूनच माझा स्पर्धेकडे कल होता, मग आव्हान कसलेही असो – खास करून खेळांमध्ये माझा नेहमीच पुढे राहण्याचा प्रयत्न असायचा.

नॉटिंगहॅम, इंग्लंड येथील आमच्या घरापासून जेमतेम दहा मिनिटांपेक्षाही कमी अंतरावर असलेल्या 'बिंगहॅम स्विमिंग क्लब'मध्ये वयाच्या केवळ सातव्या वर्षी मी पोहण्याचे धडे गिरवायला सुरुवात केली. मला जो काही काळ आठवतो आहे, त्यामध्ये एक गोष्ट नक्की की मला पोहण्याचीच आवड होती. वयाच्या आठव्या वर्षी मला कळून चुकले होते की, 'बॅकस्ट्रोक' हे माझ्या पोहण्याचे शक्तिस्थान आहे. पोहण्याच्या या प्रकारामध्ये मला विशेष गती आहे आणि त्यामुळे तरणतलावांतील स्पर्धांमध्ये तशा प्रकारे पोहणे, ही माझी ओळख होऊन गेली.

माझ्या पोहण्याच्या पद्धतीमध्ये काही दोष होते. योग्य रीतीने सुरुवात करणे, पोहताना वळण घेणे, वगैरे माझे कच्चे दुवे होते. यामध्ये मी कमी पडायचो. त्या वेळी माझे डोके वर उचलले जायचे आणि सराईत व रूढीबद्ध जलतरणपटूंप्रमाणे पाण्यात पडून राहणे मला जमायचे नाही. माझी पूर्ण भिस्त माझ्या हातांवर असायची आणि दुसऱ्या बाजूला पोहोचेपर्यंत पंख्यांच्या पात्याप्रमाणे मी जोरजोरात चक्राकार हात हलवत राहायचो. त्यामध्ये सराईतपणा नव्हता. कौशल्य नव्हते. सौंदर्य नव्हते. होती ती फक्त दात-ओठ खाऊन वापरलेली ताकद.

स्थानिक स्पर्धा उत्सवांमध्ये मी नियमितपणे भाग घ्यायचो. अगदी ठरल्याप्रमाणे ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात बक्षिसे मिळवायचो आणि आई-बाबांना माझ्या स्पर्धेचा निकाल सांगण्यासाठी आणि बक्षीस दाखवण्यासाठी धावत सुटायचो. मला वाटते, माझ्यामध्ये ही स्पर्धा करण्याची वृत्ती वडिलांकडून आलेली आहे.

त्यांचा असाच स्वभाव होता. त्यांची वृत्ती नेहमी सकारात्मक असायची आणि त्यामुळेच अत्यंत कठीण परिस्थितीतसुद्धा ते अगदी खंबीर असायचे. त्यांचा असा स्वभाव त्यांच्या आईमुळे झाला. कारण, वयाच्या अकराव्या वर्षी त्यांना निवासी शाळेमध्ये घालण्यात आले आणि तेथे त्यांना स्वावलंबी होण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

त्यांनी त्यांच्या शाळेतील सुरुवातीच्या दिवसांची सांगितलेली एक गोष्ट मला आठवते. शाळेतील वरच्या वर्गातील मुले शाळेमध्ये नव्याने दाखल झालेल्या मुलांना रॅगिंग करायची. वल्हवण्याच्या बोटीतून तळ्याच्या मध्यभागी नेऊन त्यांना पाण्यात ढकलून द्यायचे. त्यानंतर पोहत किनारा गाठण्याची जबाबदारी त्या नव्या मुलांची असायची.

माझ्या वडिलांना हा प्रकार काही पसंत नव्हता. त्यांनी त्यांच्यापुरते याला विरोध करायचे ठरवले. त्यामुळे वरच्या वर्गातील मुलांना कळून आले की हे पाणी काही वेगळेच आहे आणि याला आडवे जाण्यात काही अर्थ नाही. वडिलांनी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, 'मला जर कोणी हात लावाल, तर माझ्याबरोबर मी त्यालाही पाण्यात खेचीन.' या प्रतिक्रियेनंतर मुलांनी त्यांचा विचार बदलला आणि ते वडिलांच्या वाटेला गेले नाहीत; परंतु इतरांना मात्र पोहण्याच्या दिव्यातून जावे लागायचे.

माझ्या वडिलांना वेगळ्या खेळांची आवड होती. त्यांना खास करून क्रिकेट आणि रग्बी हे खेळ आवडायचे. रग्बी हा तर त्यांचा विशेष आवडता खेळ होता. त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षापासून ते पंचेचाळीस वर्षांपर्यंत त्यामध्ये मनसोक्त भाग घेतला. ते 'शेफील्ड टायगर्स' या त्या भागातील नामवंत क्लबच्या वतीने, त्यांच्या गुडघ्याचे हाड मोडेपर्यंत आणि नाइलाजाने निवृत्ती घ्यावी लागेपर्यंत खेळले. रग्बी संघामध्ये मैदानावर त्यांचे स्थान 'Prop forward' हे असायचे. झोकून देऊन, बेभान होऊन, परंतु न्याय्य व सरळ मार्गाने खेळण्याचे बाळकडू त्यांनी मला दिले.

माझ्या वाढत्या वयामध्ये माझे वडीलच माझे आदर्श होते. त्यांनी मला


जिंकण्यासाठी खेळण्याचे आणि त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे शिकवले. त्यांचे नेहमी एकच सांगणे असायचे, ''जीवन काहीही असो, कसेही असो, त्यामध्ये पूर्णपणे झोकून दे.'' पोहण्याच्या कोणत्याही स्पर्धेच्या सुरुवातीला त्यांचे हे शब्द मला परत परत ऐकू यायचे. त्यातून मला स्फूर्ती मिळायची आणि जिंकण्याची ईर्षा निर्माण व्हायची. कित्येक वर्षे त्यांचे हे शब्द मला साथ करत होते. जेव्हा मी इंग्लिश खाडी पोहण्यासाठी प्रशिक्षण घेत होतो, तेव्हाही हेच शब्द माझी साथ करत होते. मला त्यांचा आवाज ऐकू यायचा– 'पाय रोवून उभा राहा आणि माघार घेऊ नकोस.' जेव्हा मी थंडीमुळे गारठून जायच्या बेतात होतो, असह्य वेदना होत होत्या आणि माझे विचार मला प्रयत्न थांबवण्यास सांगत होते, तेव्हा याच शब्दांनी मला धीर दिला.

लहानपणी तसे बघितले तर पोहण्याला मी तितकेसे महत्त्व दिले नाही. काही काळ क्रिकेट, रग्बीसारखे लोकप्रिय खेळ आणि निरनिराळे वैयक्तिक व्यायामप्रकार (ॲथलेटिक्स) ही माझी पसंती होती.

वयाच्या अकराव्या वर्षी नॉटिंगहॅमशायर परगण्यातील लाँगइटॉन येथील 'ट्रेंट कॉलेज' या पब्लिक शाळेमध्ये मी प्रवेश घेतला. ती शाळा आमच्या घरापासून तीस मिनिटांच्या अंतरावर होती. माझा मोठा भाऊ मार्क हाही त्याच शाळेमध्ये शिकत होता. तो माझ्यापेक्षा सात वर्षांनी मोठा होता. मी जेव्हा शाळेत दाखल झालो, तेव्हा तो शेवटच्या वर्षात शिकत होता. माझ्यासारख्या खेळाची आवड असलेल्या मुलासाठी ती शाळा अगदी योग्य होती, कारण तेथे खेळांच्या दृष्टीने खूप चांगल्या सुविधा उपलब्ध होत्या. त्या शाळेमध्ये बंदिस्त तरणतलाव होता, तसेच रग्बी आणि क्रिकेटसाठी मैदानही होते. शाळेमध्ये फुटबॉल खेळण्याची सोय नसल्यामुळे मी रग्बीची निवड केली आणि ट्रेंट नदीच्या काठावर असलेल्या आमच्या रॅडक्लीफ या खेड्यातील अकरा वर्षांखालील मुलांच्या 'Dayncourt' संघामध्ये खेळायला लागलो.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# ज्ञानसूर्याचे आकाश

### मंजुश्री गोखले

*निवृत्तिनाथांच्या व्यक्तित्वाचा रसाळ भाषेत घेतलेला परिपूर्ण वेध*

**भ**ल्या पहाटेची वेळ. सूर्योदयाला अजून तासभर तरी अवकाश होता. पूर्व क्षितिज अजून तरी अंधारातच होतं. निळ्या आकाशात चांदण्या अजून लुकलुकत होत्या. चंद्राची कोरही अंधूकपणे दिसत होती. माणसं ओळखू येतील इतपतही प्रकाश नव्हता. वैशाख महिना असूनही दिवसभराची तल्खी कमी होऊन मंद असा गार वारा सुटला होता. त्या गार वाऱ्यानं अंगावर शहारा येत होता. त्या गार वाऱ्यासोबत

पूर्णेचं पाणी तरंगांची नक्षी अंगभर लेवून मंदपणे वाहत होतं. ‘पयोष्णी’ असं तिचं दुसरं नाव. तिला ‘संपूर्णा’ असंही म्हणतात. मंद वाऱ्यासोबत पूर्णेचं पाणीही मंद वाहत होतं. अगदी मंद, संथपणे. तिला घाई नव्हतीच मुळी. कारण लगेचच ती तापी नदीला जाऊन मिळणार होती; आणि पुढं ‘तापी’ म्हणूनच वाहणार होती. तिचं ‘पूर्णा’ हे अस्तित्व आता संपणार होतं. हे अस्तित्व जितका काळ टिकवून ठेवता येईल, तेवढं तिला ठेवायचं होतं. कारण एका महान योगिनीशी तिचं नाव जोडलं गेलं होतं, कायमचं! या तृप्त भावनेनं ‘पूर्णा’ संथ लयीत वाहत होती. तिचे तरंग दोन्ही काठांवर आपटत होते. पण तेही हळुवारपणे, अलवारपणे. जणू त्यांच्या स्पर्शानं कुणाला तरी जाग येणार होती. त्यांच्या ‘चुळुक चुळुक’ आवाजानं कोणाचं तरी लक्ष विचलित होणार होतं.

खरंच होतं ते! ‘पूर्णे’च्या काठावर एका मातीच्या ढिगाऱ्यावर निवृत्ती बसला होता. त्याचे डोळे नदीच्या पात्रात मध्यभागी खिळले होते. मध्येच ते दुतर्फा पाण्यानं भरलेलं पात्र अंधूक होई. निवृत्तीच्या डोळ्यांत तेव्हा पाणी भरलेलं असे. पण ते पुसायचंही भान त्याला नव्हतं. पाणी डोळ्यांत काठोकाठ भरलं, की गालावर ओघळत असे. पुन्हा त्याला पूर्णेचं पात्र स्पष्टपणे दिसू लागे. पुन्हा त्या पात्राकडे तो नजर खिळवून बसायचा. काल सूर्यास्तापासून निवृत्ती इथंच बसला होता, अशीच नजर खिळवून. फक्त कधी ती नजर आकाशावर खिळवायचा, तर कधी पाण्यावर. आकाशातील ढगांची बारीकशी हालचाल, पाण्यात उमटणारे अलवार तरंग, त्यांची होणारी अलगद हालचालही तो आपल्या रोखलेल्या नजरेनं टिपत होता. पाण्याकडे आणि मधूनच आकाशाकडे एक टक बघत असताना तो पापणीसुद्धा हलवायचा नाही. न जाणो, पापणी निमिषभर मिटली आणि त्या उघड-झापीच्या निमिषात आपण शोधतोय ती गोष्ट नजरेआड झाली तर? मनाने घायाळ झालेला, हृदयाच्या चिंध्या झालेला, भावनेच्या प्रवाहात कोसळून पडलेला, आपलं सगळं तेज, सगळं शहाणपण, सगळं ज्ञान, सगळी बुद्धिमत्ता, सगळा संयम हरवून बसलेला निवृत्ती रात्रभर ‘पूर्णे’च्या काठावर हताश होऊन बसला होता. त्याच्या त्या एकवटलेल्या, रोखलेल्या नजरेत प्रतीक्षा होती. पण आता बारा तास उलटून गेले आणि निवृत्तीचा धीर सुटला. आत्तापर्यंत कोंडून धरलेला हुंदका ‘टाहो’ फोडत बाहेर आला. आवरून धरलेला मनाचा उमाळा अश्रूंच्या रूपात वाहू लागला आणि घायाळ आवाजात निवृत्तीनं ‘टाहो’ फोडला.

'मुक्ताऽऽऽ!' आणि मग मात्र एकापाठोपाठ एक तो हाका मारत राहिला. 'मुक्ताऽऽऽ! मुक्तेऽऽऽ! मुक्ताईऽऽऽ! छकुलेऽऽऽ! कुठं आहेस गं तूऽऽ? हा तुझा निवृत्तीदादा तुला हाका मारतोय गं! ये गं माझी बयोऽऽ! मुक्ताऽऽऽ!' निवृत्तीच्या त्या घायाळ हाका 'पूर्णे'च्या पाण्यावर जाऊन आदळत राहिल्या. त्या पाण्यावर उठणाऱ्या तरंगांतून 'पूर्णे' च्या अंगभर पसरल्या. त्या हाकांच्या आवाजाला त्या तरंगांच्या वलयांनी विळखा घातला, आणि त्या हाकांचा ध्वनी आकाशात फेकला. ऊर्ध्वगामी झालेला तो ध्वनी आकाशभर घुमत राहिला आणि या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत नादत राहिला. त्या सादवण्यात एकच नाव होतं 'मुक्ताऽऽ! मुक्ताऽऽऽ! मुक्ताऽऽऽ!'

अवघी चराचर सृष्टी त्या ध्वनी-प्रतिध्वनीनं व्यापली आणि दहा दिशांतून एकच शब्द, एकच नाव, एकच साद भरून राहिला. 'मुक्ताऽऽ!' ओंजळीत चेहरा धरून ढसढसा रडणाऱ्या निवृत्तीला दशदिशांत घुमणारी ती हाक ऐकू आली आणि त्याला वाटलं, 'अवघी सृष्टी माझ्या मुक्ताला हाका मारते आहे.' आता तिला नक्की ऐकू जाईल आणि ती हाकेला 'ओ' देईल. सादाला प्रतिसाद देईल. पण काही क्षण तसेच गेले. काही क्षण तो प्रतिध्वनी दशदिशांतून फिरत राहिला आणि काही क्षणांनंतर तो शांत झाला. तो ध्वनीच नव्हे, तो प्रतिध्वनीच नव्हे, तर अवघी चराचर सृष्टी शांत शांत झाली. ती शांतता इतकी गहिरी होती, इतकी नीरव होती, की 'पूर्णे'वर एका लयीत उमटणाऱ्या तरंगांच्या त्या लयीचाही अस्फुट ध्वनी स्पष्ट ऐकू येत होता. त्या शांततेनं निवृत्ती दचकला, क्षणभर घाबरलादेखील. 'आता सगळं शांत झालंय! सगळे जण मुक्ताला हाका मारत होते तेही शांत झालेत. पण म्हणजे मुक्तानं कुणाच्याच हाकेला 'ओऽ' दिली नाही. माझ्या, या निवृत्तीदादाच्यासुद्धा!' त्याचं मन चरकलं आणि आता मात्र स्वत:ला सावरण्याचा यत्किंचितही प्रयत्न न करता निवृत्तीनं त्या मातीच्या ढिगाऱ्यावर स्वत:ला झोकून दिलं. एखाद्या अजाण लेकरानं स्वत:ला आईच्या मांडीवर झोकून द्यावं, तसं आणि मग मात्र बांध फुटावा तसा तो आकांत करू लागला. त्या मातीच्या ढिगाऱ्यावर पडून निवृत्ती हुंदके देऊन रडायला लागला. गहिनीनाथांचा शिष्य, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता यांचा मोठा भाऊ निवृत्तीदादा, ज्ञानेश्वर-सोपानाचा गुरू निवृत्तिनाथ, आत्ता या क्षणी विठ्ठलपंत-रुक्मिणीचा मोठा मुलगा, छोटा निवू होऊन ढसाढसा रडत होता. हुंदक्यांनी त्याचं सगळं अंग

गदगदत होतं. गाल, चेहराच काय, पण उत्तरीयही अश्रूंनी भिजलं होतं. डोळ्यांतून वाहणारं पाणी थांबायचं नाव घेत नव्हतं. सारा आसमंत जणू स्तब्ध झाला होता आणि ऐकू येत होता फक्त निवृत्तीचा हुंदका. त्याचं टाहो फोडणं आणि गदगदून रडणं. हे रडणं साधं नव्हतं. तत्कालिक नव्हतं. तात्पुरतं नव्हतं. हा होता गेल्या सहा-सात महिन्यांच्या दु:खाचा दाटून आलेला गहिवर, साठून राहिलेली वेदना, भरून आलेला वियोग, कोंडून ठेवलेल्या भावनांचा निचरा, हृदयाचा झालेला कोंडमारा, मनाच्या झालेल्या चिंध्या, मोठेपणाचं, मोठा भाऊ असण्याचं झालेलं ओझं, या सगळ्यांचा मिळून होणारा तो अश्रुपात होता. या सगळ्या भावनांचा दृक्परिणाम म्हणजे निवृत्तीचं रडणं होतं. आणि हे सगळ्या चराचर सृष्टीला ज्ञात होतं. म्हणूनच सगळी सृष्टी शांत होती, नि:स्तब्ध होती, आणि निवृत्ती एकटाच रडत होता... एकटाच!

आत्ता, या क्षणी तो खरोखरच, अगदी खरोखरच एकटा होता. निवृत्ती असा कधीच एकटा नव्हता. कधीच! ना दु:खाच्या क्षणी, ना आनंदाच्या क्षणी. नेहमीच त्याच्या सोबत ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता असायचेच असायचे. काहीही झालं तरी ते त्याच्या अवतीभवती असायचे. 'दादाऽऽ दादा' करत सभोवती राहायचे. इतके वाईट प्रसंग आले, इतकी संकटं आली, इतके दु:खाचे क्षण आले आणि तितकेच आनंदाचे क्षणही आले. यातल्या कुठल्याही प्रसंगात तो कधीच एकटा नव्हता; पण आज? आज मात्र दु:खाच्या या महासागरात निवृत्ती एकटाच होता. अगदी एकटा. डोळ्यांतून कितीही पाणी वाहिलं, तरी ते पुसणारं कुणीच नव्हतं. हुंदका कितीही दाटून आला, तरी पाठीवरून कुणाचाच हात फिरत नव्हता. 'दादा, रडू नको,' असं सांगणारंही कुणीच नव्हतं. अगदी कुणीच!

आपण आतापर्यंत काय काय गमावलं, हे निवृत्तीच्या आता एकेक लक्षात येत होतं. त्यानं ज्ञानेश्वर गमावला होता. सोपान गमावला होता आणि आता त्यानं मुक्तालाही गमावलं होतं. होय. 'पूर्णे'च्या काठावर बसून निवृत्ती विलाप करत होता तो याच कारणासाठी. काल वैशाख कृष्ण दशमी. काल संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी मुक्ता, त्यांची लाडकी मुक्ता 'पूर्णे'च्या या पात्रातून कुठेतरी गुप्त झाली. अजून सूर्यास्त व्हायचा होता; तरीही अचानक अंधारून आलं. आसमंत तर काळाभोर झाला. निवृत्ती आणि

मुक्ता ‘पूर्णे’च्या पात्रात पाय सोडून बसले होते. वैशाख महिना असल्यामुळे ‘पूर्णे’ला पाणी तसं कमीच होतं. मुक्ताला काय वाटलं, कोण जाणे! ती पटकन उठली आणि निवृत्तीला म्हणाली, ‘‘दादा, काही क्षण थांब. मी नदीच्या मध्यभागी जाऊन येते!’’ निवृत्ती तिच्याकडे बघतच राहिला. म्हणाला, ‘‘अगं मुक्ते, आता आपण किती तरी वेळ पाण्यात पाय सोडून बसलोच आहोत ना; या पिंपळाच्या झाडाखाली बसल्यामुळे त्याची छान गार सावलीही आहे आपल्या डोक्यावर! मग आता तुला पात्राच्या मध्यभागी कशाला जायचंय?’’ त्याचं हे बोलणं ऐकून नेहमीच्या सवयीप्रमाणे मुक्तानं नाक उडवलं, मानेला झटका दिला आणि फणकाऱ्यानं म्हणाली, ‘‘मला वाटलंच होतं तू असं म्हणणार! दादा, हे असं नदीच्या काठावर पाण्यात पाय सोडून बसणं म्हणजे आई हातानं घास भरवत असताना तिला तो ‘पळीने भरव’ असं सांगण्यासारखं आहे. अरे, नदी म्हणजे आई! तुला सांगू दादा, या सृष्टीचक्रात दोनच गोष्टी अशा आहेत ज्या ‘मातृका’ आहेत. मातृत्वाने परिपूर्ण आहेत. त्या दोन गोष्टी म्हणजे धरित्री आणि नदी! आणि या दोघींचं मातृत्व अनुभवायचं असेल तर त्यांच्या कुशीत शिरलं पाहिजे. म्हणूनच, दादा, मला समाधीसुद्धा या दोघींच्या कुशीतच घ्यायची आहे. मी काही ‘सीतामाता’ नाही की मला धरणीनं कुशीत घ्यावं; त्यामुळे मी ठरवलंय धरणीच्या कुशीत नाही तर नाही, पण नदीच्या कुशीत तरी शिरून बघावं की ती कुशीत घेते का? ते पाहण्यासाठीच दादा मी पात्राच्या मध्यभागी जाणार आहे!’’

मुक्तीनं बोलणं संपवलं आणि निवृत्तीने काही म्हणायच्या आतच ती नदीच्या पात्रात शिरलीसुद्धा. बघता बघता मुक्ता कमरेएवढ्या पाण्यापर्यंत गेली. निवृत्ती पाठीमागून हाका मारत होता, ‘‘मुक्ताऽऽऽ! मुक्ताऽऽऽ!’’ पण मुक्ताच्या कानापर्यंत त्याच्या हाका बहुधा जातच नसाव्यात, कारण तिनं एकदाही मागे वळून बघितलं नाही. ती तशीच पुढेपुढे जात राहिली. तिच्या तशा पुढे जाण्यामध्ये सुद्धा एक वेगळाच निग्रह होता. निश्चय होता. कमरेएवढ्या पाण्यातूनसुद्धा ती ज्या ठामपणे चालत होती, ते बघूनच निवृत्तीच्या हे लक्षात आलं. बसल्या जागेवरून तोही उठला. मुक्ता मागे वळतही नाही आणि वळून पाहतही नाही, हे त्याच्या जसं लक्षात आलं, तसा त्याच्या हृदयाचा ठोका चुकला. तोही गडबडीनं पाण्यात शिरू लागला.

पाऊल पुढे टाकत असताना उत्तरीय पायांत अडकलं ते वाकून काढण्याआधी त्यानं नदीपात्राकडे नजर टाकली. मुक्ता पात्राच्या मध्यभागी पोहोचली होती. ''मुक्तेऽऽऽ! मुक्तेऽऽऽ! थांब, मी आलो. एकटी पुढे जाऊ नको. थांब!'' असं मोठ्यांदा ओरडून सांगत तो खाली वाकला. अंधारलेल्या आसमंतात नदीच्या पात्रातून चालत जाणारी मुक्ताची धूसर आकृती तेवढी दिसत होती. पायांत अडकलेलं उत्तरीय काढण्यासाठी तो खाली वाकला आणि त्या अंधारलेल्या आसमंतात एक वीज कडाडली. विजेची ती प्रखर प्रकाशमान रेषा अंधारलेल्या आसमंताचं काळीज चिरत 'पूर्णे'च्या पाण्यावर उतरली. क्षणभर 'पूर्णे'चं संपूर्ण पात्र प्रकाशमान झालं, उजळून निघालं. पाण्यावर उमटलेल्या लक्षावधी तरंगांमध्ये त्याच्या लक्षावधी प्रतिमा उमटल्या आणि त्या लख्ख प्रकाशात मान उंचावून पाहणाऱ्या निवृत्तीनं जे पाहिलं त्यामुळे त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. विजेच्या त्या लवलवत्या प्रकाशात एखाद्या बाणासारखी मुक्ता 'पूर्णेच्या पात्रा'तून आसमंतात खेचली गेली आणि क्षणार्धात ती वीज जशी गुप्त झाली, तशीच मुक्ताही त्या विजेसोबत त्या आसमंतात दिसेनाशी झाली; गुप्त झाली. अंतर्धान पावली. पायांत अडकलेल्या उत्तरीयाचं टोक हातात धरून उभ्या असलेल्या निवृत्तीच्या शरीरातलं त्राणच नाहीसं झालं. त्या दृश्याचा त्याच्या मनावर प्रचंड आघात झाला. सोपानाने समाधी घेतल्यापासून, गेली चार-पाच महिने, 'आपण समाधी घेणार,' हे मुक्ता बोलतच होती आणि प्रत्येक वेळी निवृत्ती तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न करत होता. ती ऐकणार नाही, हे त्याला माहीतही होतं; पण ती अशी इतकी अकस्मात समाधिस्थ होईल, याची त्याला अजिबात कल्पना नव्हती. नव्हे, तो कल्पना करूच शकत नव्हता. पण ते आज घडलं होतं. त्याच्या कल्पनेच्याही पलीकडे असलेलं आज प्रत्यक्षात त्याच्या नजरेसमोर घडलं होतं आणि सर्वांत मोठं दु:ख याचं होतं, की मनात अत्यंत तीव्र इच्छा असूनसुद्धा जे समोर घडत होतं, ते तो थांबवू शकला नाही. एका ज्ञानी, स्वयंपूर्ण, स्वयंप्रकाशित असलेल्या योगिनीचं आयुष्य त्याच्या नजरेसमोर संपलं होतं आणि तो काहीही करू शकला नव्हता.

रडण्याचा पहिला आवेग ओसरला आणि आता आपली मुक्ता कधीच परत येणार नाही, आपण तिला कायमचं गमावून बसलो याची खात्रीशीर आशंका निवृत्तीला वाटू लागली. आपल्याला बोलण्यात गुंतवून ठेवत मुक्ता

समाधिस्थ झाली हे महाभयंकर असलं, तरी सत्य होतं. निवृत्तीला मनात नसूनही हे सत्य स्वीकारणं भाग होतं. हे सत्य कळून चुकलं आणि निवृत्तीला स्वत:च्या मनाचं सुद्धा ओझं वाटायला लागलं. त्याला मुक्ताचे शब्द आठवले. 'धरणी आणि नदी या दोन मातृका आहेत!' त्यानं स्वत:ला त्या मातीच्या ढिगाऱ्यावर लोटून दिलं. आता ना त्याच्या अंगात बसण्याचं त्राण होतं, ना रडण्याची शक्ती. आपल्या मनात उद्भवणाऱ्या विचारांचंही त्याला ओझं वाटायला लागलं. आपल्या शरीरावर, मनावर, हृदयावर, बुद्धीवर, विचारशक्तीवर, कल्पनाशक्तीवर कसलं तरी मणामणाचं ओझं लादलं आहे, असं त्याला वाटायला लागलं आणि तो त्या ढिगाऱ्यावर बेशुद्ध पडला.

निवृत्तीला इकडेतिकडे शोधून नामदेव आणि इतर संत मंडळी धावत धावत 'पूर्णेच्या काठा'वर पोहोचली. काल संध्याकाळपासून निवृत्ती आणि मुक्ताई दोघे जण 'पूर्णेच्या काठा'वर येऊन बसली आहेत, हे नामदेवाला समजलं होतं. पण या चौघांच्या सतत सहवासात राहिल्यामुळे ही भावंडं अशी काही गहन चर्चा करताना असेच भान हरपून बसतात, हे त्याला आता इतक्या दिवसांच्या सहवासानंतर माहीत झालं होतं. त्यामुळेच मनात असूनसुद्धा अंधार पडल्यावर तो या दोघांना बोलवायला आला नव्हता. पण आता बारा तास उलटून गेले होते. त्यामुळे त्या दोघांना खाण्या-पिण्याची शुद्ध नसली, तरी नामदेवाला आणि त्याच्या सोबत्यांना त्यांची काळजी करणं गरजेचं होतं. म्हणूनच आपल्या सोबत चोखोबा, गोरोबाकाका, सावता या सगळ्यांना घेऊन नामदेव 'पूर्णेच्या काठा'वर आला. इकडेतिकडे शोध घेत असताना मातीच्या ढिगाऱ्यावर बेशुद्ध पडलेला निवृत्ती त्याला दिसला. सगळे जण धावतच तिथं गेले. चोखोबानं धावत जाऊन ओंजळीतून नदीचं पाणी आणलं. नामदेवानं त्या पाण्याचे चार शिंतोडे निवृत्तीच्या चेहऱ्यावर उडवले. पाण्याच्या त्या शीतल स्पर्शानं निवृत्ती शुद्धीवर आला. सावध झाला. नामदेवानं इकडेतिकडे पाहिलं. मुक्ता कुठेच दिसत नव्हती. निवृत्ती सावध झाला, उठून बसला आणि त्यानं नामदेवाला विचारले, "नामदेवा, मुक्ता... मुक्ता कुठे गेली तुम्ही कोणी पाहिलंत का?" निवृत्तीचा तो प्रश्न ऐकून सगळ्यांना धक्का बसला. "म्हणजे? निवृत्तीदादा, मुक्ताई तुमच्यासोबतच होती ना? तुम्हाला माहीत नाही का ती कुठे गेली ते? आणि तुम्ही इथं या मातीच्या ढिगाऱ्यावर शुद्ध हरपून पडला होतात. काय झालं? इथं कोणी आलं होतं का? मुक्ताई

कुठे गेली?'' नामदेव जसजसे प्रश्न विचारत होता, तसतसं निवृत्तीला भान आलं. तो सावध झाला. पूर्ण सावध झाला. त्याला सगळं सगळं आठवलं आणि ते आठवता क्षणीच त्याचे डोळे पुन्हा भरून आले. निवृत्तीचे डोळे पाण्याने भरले आहेत, हे नामदेवाच्या लक्षात आलं. त्याचं मन चरकलं. काही तरी विपरीत घडलं होतं खास! एक तर मुक्ताई तिथं कुठे दिसत नव्हती आणि दुसरं म्हणजे तिच्याबद्दल विचारताच निवृत्तीला रडू कोसळलं होतं. मनाच्या त्या चरकलेल्या अवस्थेतच नामदेवाने इकडेतिकडे नजर टाकली. पूर्णेचं पाणी शांत होतं, स्थिर होतं. आसपासचा परिसर निर्मनुष्य होता, शांत होता. एका वेगळ्याच आशंकेनं नामदेवाच्या मनाचा थरकाप झाला. या परिसरात यावनी सत्ता होती. रयतेवर होणाऱ्या अनेक जुलूम जबरदस्तीच्या कथाकहाण्या कानावर येत होत्या.

मुक्ता सोळा-सतरा वर्षांची, नाकी डोळी नीटस, गोरी. तिचं काही बरंवाईट...? 'नामदेवाच्या मनात आलेल्या शंकेनं त्याच्या मनाचा थरकाप झाला. न राहवून त्यानं निवृत्तीचे खांदे पकडले आणि त्याला गदागदा हलवत विचारलं, ''निवृत्तीदादा, मुक्ता... मुक्ताई कुठे आहे?' नामदेवाच्या या विचारण्यावर काहीही न बोलता निवृत्तीने नदीच्या पात्राकडे बोट दाखवलं. ते बघता क्षणी चोखोबाने नदीत उडी मारली. झपाट्याने पाणी कापत तो पात्राच्या मध्यभागी गेला. पाणी जास्त खोल नव्हतंच. चोखोबा पाण्यात उभा राहिला. पाणी जेमतेम त्याच्या खांद्यापर्यंत आलं. पुन्हा पाण्यात डुबकी मारून चोखोबाने पाण्याच्या तळाशी शोध घेतला; पण पाण्याच्या तळाशी कोणीच नव्हतं. पाण्यातून मान वर काढून चोखोबाने 'नाही, नाही' अशा अर्थाने हात हलवला. ते निवृत्तीनेही पाहिलं. आतापर्यंत तो बराच सावरला होता. डोळ्यांतलं पाणी तसंच वाहू देत, आलेला हुंदका आवरत निवृत्ती म्हणाला, ''नाही नामदेवा, मुक्ता तिथं सापडणार नाही. ती गेली. ती गुप्त झाली. मी समोरच असून मलाही समजलं नाही ती कधी, कुठे व कशी गेली ते! पण एवढं मात्र खरं की आपली मुक्ताई, माझी मुक्ता आपल्याला सोडून गेली.''

निवृत्तीचं बोलणं थिजलेल्या मनानं ऐकणाऱ्या नामदेवाला काहीच बोध झाला नाही. फक्त 'मुक्ता गेली' एवढंच समजलं. नामदेवानं गोरोबाकाकांना सांगून लोटीतून पाणी आणवलं आणि ते निवृत्तीला प्यायला दिलं. हपापल्यासारखं निवृत्ती ते पाणी प्यायला. त्या शीतल पाण्याचे चार घोट पोटात जाताच

निवृत्तीलाही बरं वाटलं. तो पुरता सावरला. नीट बोलण्याच्या अवस्थेत आला. नामदेवाला समोर बघितल्याबरोबर निवृत्ती उठून उभा राहिला आणि त्यानं नामदेवाला मिठी मारली. नामदेवाच्या कवेत निवृत्ती एखाद्या लहान मुलासारखा ढसाढसा रडायला लागला. त्याच्या डोळ्यांतून अविरत अश्रू वाहत होते. काय नव्हतं त्या अश्रूंमध्ये? ज्ञानेश्वर, सोपान आणि आता मुक्ता या तिघांच्या वियोगाचं दु:ख. आपल्या नजरेसमोर हे सगळं घडलं याची वेदना. आपण त्या बाबतीत काहीही करू शकलो नाही, याची असहायता. आपल्यापेक्षा वयानं लहान असलेली आपली तिन्ही भावंडं आपल्या आधी पैलतीराला गेल्याची काळीज कुरतडणारी जाणीव. आपण या तिघांपेक्षा वयाने कशासाठी मोठे झालो, याबद्दलची तक्रार. आता या तिघांशिवाय आपण एकटे पडलो, या पोरकेपणाचं दु:ख! आपण हठयोगी असूनसुद्धा समोर घडणारं आणि तेही आपल्या जिवलगांच्या बाबतीत घडणारं आपण थांबवू शकलो नाही, याची खंत आणि आपण निराधार झाल्याची जाणीव या सगळ्या भावभावना घेऊन बावीस-तेवीस वर्षांचा निवृत्ती नामदेवाच्या कवेत शिरून एखाद्या लहान मुलासारखा रडत होता आणि त्याच्यापेक्षा चार-पाच वर्षांनी मोठा असलेला नामदेव निवृत्तीच्या पाठीवरून आईच्या मायेनं हात फिरवत होता, कितीतरी वेळ! चहूकडे असलेल्या नि:स्तब्ध शांततेला निवृत्तीच्या हुंदक्यांचा आवाज छेद देत होता. सगळ्यांच्या मनात शंकेचं काहूर माजलं होतं. ही स्तब्धता शेवटी गोरोबाकाकांनी मोडली. नामदेवाच्या खांद्याला स्पर्श करून त्याला हळूच विचारलं, ''म्हाराज, नक्की काय झालं म्हनावं? मुक्ताई कुटं गेली आसंल? पान्यात बुडाली आसंल काय?'' गोरोबाकाकांनी जणू सगळ्यांच्या मनातील प्रश्न विचारला. त्यांनी कुजबुजल्या स्वरात विचारलं असलं, तरी भोवताली असलेल्या नीरव शांततेमुळे नामदेवाच्या खांद्यावर मान ठेवून अश्रू ढाळणाऱ्या निवृत्तीलाही ते ऐकायला गेलं. आपण यांना सगळं सांगितल्याशिवाय यांच्या मनातले प्रश्न संपणार नाहीत, असं त्याच्या लक्षात आलं. आता रडण्याचा आवेग ओसरला होता. सगळं सांगण्याइतपत निवृत्ती सावरला होता. नामदेवाच्या मिठीतून बाजूला होत त्याने उत्तरीयाने आपला चेहरा, नाक, डोळे पुसले. जणू मनावर झालेला तो दु:खाचा आघात निवृत्तिनाथाने पुसून टाकला. गोरोबाच्या हातातून पाण्याची लोटी घेऊन उरलेलं पाणी गटागटा पिऊन त्यानं स्वत:ला सावरलं,

आवरलं आणि तो जणू गहिनीनाथांचा शिष्य बनला. आता तो ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता या तिघांचा निवृत्तीदादाही नव्हता; तर हठयोगी निवृत्तिनाथ होता.

निवृत्तिनाथाने एकवार सगळ्यांवरून नजर फिरवली. सगळ्यांच्या चेहऱ्यावर अनेक प्रश्न होते. अनेक शंका होत्या. अनेक आशंकाही होत्या. आणि त्या प्रश्नांनी, त्या शंका-कुशंकांनी त्या सगळ्यांना अस्वस्थ केलं होतं, हे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्टपणे जाणवत होतं. निवृत्तिनाथाने एक खोल श्वास घेतला. तितकाच दीर्घ उच्छ्वास सोडला. श्वास आणि उच्छ्वास यांच्यामधील लयही तेवढीच दीर्घ होती. तो नेहमी म्हणायचा, ''ज्ञानेश्वर माझा श्वास आहे. सोपान माझा उच्छ्वास आहे. तर मुक्ताई श्वास-उच्छ्वासानंतर निर्माण होणारी लय आहे.' आता ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता ही तिघंही नाहीत. म्हणजे आपला श्वास, उच्छ्वास आणि लय तिन्ही नाहीत. त्याचे डोळे पुन्हा भरून येऊ पाहत होते; पण त्यानं आता स्वत:ला सावरलं. आपण काहीतरी सांगण्याची, काहीतरी बोलण्याची ही मंडळी वाट बघत आहेत, हे त्याला पुन्हा जाणवलं, आणि अत्यंत तटस्थ स्वरात त्यानं बोलायला सुरुवात केली.

''नामदेवा, चोखोबा, गोरोबाकाका, आपली मुक्ता गेली. तिनं संजीवन समाधी घेतली. गेले चार-पाच महिने, म्हणजे सासवडला सोपानाने संजीवन समाधी' घेतल्यापासून ती माझ्या मागे लागली होती, की तिलाही समाधी घ्यायची आहे. पण माझी तिच्यावरची माया आणि तिचं कोवळं वय याचा विचार करून मी तिला तिच्या या निर्णयापासून परावृत्त करत होतो. पण आज आम्ही दोघे या 'पूर्णेच्या काठा'वर बसलो असताना अचानक 'मला या नदीच्या कुशीत शिरायचंय,' असं सांगून मुक्ताने नदीत प्रवेश केला. नदीच्या पाण्यातून भराभरा चालत ती नदीपात्राच्या मध्यभागी पोहोचली. मी पाठीमागून, 'मुक्ताऽऽ! मुक्तेऽऽ!' अशा हाका मारून तिला थांबवण्याचा प्रयत्न करत होतो. ती नदीच्या पात्रात मध्यभागी पोहोचली आणि त्या क्षणी अंधारून आलं. सूर्यास्ताला बराच अवकाश होता तरीही खूप अंधारून आलं. दुसऱ्या क्षणाला आकाशातून विजेचा एक लोळ खाली पूर्णेच्या पाण्यावर पडला आणि तो विजेचा लोळ मुक्ताला आपल्यासोबत घेऊन आकाशात गेला. त्या विजेच्या लोळात मुक्ता अदृश्य झाली, दिसेनाशी झाली. तिने ल्यायलेल्या केशरी लुगड्याचा पदर मला क्षणभर आकाशात

लहरताना दिसला. दुसऱ्या क्षणाला तो पदरही लुप्त झाला. आसमंत पुन्हा प्रकाशमान झाला आणि माझी मुक्ता कुठेच दिसली नाही. माझी मुक्ता त्या विजेच्या कल्लोळात नाहीशी झाली. गुप्त झाली. तिला या पृथ्वीतलावरून स्वर्गात नेण्यासाठी प्रत्यक्ष परमेश्वरानं पृथ्वी आणि स्वर्ग यांच्यामध्ये विजेचा एक साकव[१] तयार केला आणि त्यावरून मुक्ता साक्षात स्वर्गात पोहोचली. नामदेवा, आई म्हणाली होती, की मुक्ताच्या जन्माच्या वेळीसुद्धा असंच अंधारून आलं होतं. आम्ही तेव्हा आपेगावला राहत होतो. अशीच विजेची लखलखती रेषा त्या अंधारलेल्या आसमंताला छेदत उमटली होती, आणि त्या क्षणी मुक्ताचा जन्म झाला होता. नामदेवा, तिच्या जन्माच्या वेळीही ती त्या विजेच्या लखलखत्या साकवावरून या पृथ्वीतलावर आली होती आणि आताही ती त्या लखलखणाऱ्या विजेच्या साकवावरून स्वर्गस्थ झाली. अंतर्धान पावली, गुप्त झाली, समाधिस्थ झाली. ती 'आदिमाया' होती, 'आदिशक्ती' होती. 'योगिनी' होती. साक्षात भगवती होती. नामदेवा, मला कळत नाही, की मी तिचा मोठा भाऊ झालो म्हणून स्वतःला भाग्यशाली समजू, की तिचा सहवास मला अवघा सोळा वर्षं लाभला म्हणून स्वतःला दुर्दैवी समजू. एवढं मात्र नक्की, की मुक्ताचा मोठा भाऊ असण्यामुळे माझा जन्म सार्थकी लागला.''

सुरुवातीला तटस्थपणे बोलणाऱ्या निवृत्तीचा आवाज शेवटी हळूहळू कापत गेला. घशात हुंदका दाटून आला आणि पुन्हा त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहायला लागलं. फरक इतकाच होता की, थोड्या वेळापूर्वी तो एकटाच रडत होता. सगळ्यांची मनं आशंकेनं भरली होती. पण आता मात्र, निवृत्तीनं सगळी हकीकत सांगितल्यावर सगळ्यांच्या मनातली भयचकीत करणारी आशंका पुसली गेली होती. पण तिची जागा व्याकूळतेने आणि दुःखाने घेतली होती. सगळ्यांच्याच घशात हुंदका दाटून आला होता आणि सगळ्यांचे डोळे पाझरत होते. 'मुक्ता अवघी सोळा-सतरा वर्षांची ती पोर! अगाध बुद्धिमत्ता होती तिची. वयाच्या सहाव्या वर्षांपासूनच ती अभंगरचना करायला लागली होती आणि अभंगरचना तरी कशी? चोख बावनकशी सोनंच जणू! ती लहान, तीन वर्षांची असताना पोरकी झाली. पुढची दोन-तीन वर्षं तिला तीन भावंडांनी सांभाळली आणि त्यानंतर त्या तिघांना मुक्तानं सांभाळलं. मुक्ताची ती 'मुक्ताई' कधी झाली ते तिचं तिलाच

समजलं नाही आणि त्यानंतर मुक्ता सगळ्यांचीच 'आई' झाली. तिचं तेजस्वी रूप आणि अलौकिक बुद्धिमत्ता बघितली, की ही नक्की 'आदिशक्ती'च आहे असंच वाटायचं. मुक्ता होतीच तशी! तिचं आणि सोपानाचं फार मेतकूट होतं. सोपानानं सासवडला समाधी घेतली आणि मुक्ता सैरभैर झाली. घायाळ मनानं वावरू लागली. निवृत्ती मोठा भाऊ असला, दादा असला तरी तो मोठा भाऊ होता. सोपानसारखा भाऊ आणि सवंगडी नव्हता. म्हणून तेव्हापासूनच ती जाण्याची भाषा करू लागली होती. प्रत्येक वेळी तिचा निवृत्तीदादा तिला या विचारापासून परावृत्त करायचा आणि दादाचा आदेश मानून ती समाधीचा विचार पुढे ढकलायची. पण सोपानाच्या समाधीनंतर चांगदेवानं समाधी घेतली आणि मुक्ताच्या मनावर आणखी एक ओरखडा उठला. १४०० वर्षांच्या चांगदेवाला मुक्ताने मुलगा मानले होते; पुत्र मानला होता.

१४०० वर्षं जगलेला चांगदेव तसा पारमार्थिक ज्ञानाच्या बाबतीत कोराच होता. त्याला परमार्थाच्या रस्त्यावरून मुक्तानं बोट धरून नेलं. त्याला उपदेश केला. सोपान असताना आणि नंतर सोपान नसतानासुद्धा चांगदेवाला उपदेश करणं, त्याच्या प्रश्नांची उत्तरं देणं, त्याचे शंकासमाधान करणं हे मुक्ताईला एक व्यवधान होतं. पण सोपानापाठोपाठ चांगदेवानंही समाधी घेतली आणि मुक्ताला वेळ आणि विचार खायला उठले. नाहीतरी 'पृथ्वीतलावरचं आपलं काम आता पूर्णत्वाला गेलं आहे,' असा आदेश ज्ञानदादानं दिलाच होता. समाधिस्थ सगळ्यांनीच व्हायचं होतं. फक्त पुढे कोण आणि मागे कोण, एवढाच प्रश्न होता. ज्ञानेश्वरानं सर्वांत आधी समाधी घेऊन या क्रमवारीला सुरुवातही केली होती. नंतर सोपान, नंतर त्यांच्या परिवारातला नसूनही परिवारातलाच एक झाल्यासारखा चांगदेव! मुक्ताला उमगलं होतं की आता आपण. पण तरीही निवृत्तीदादाचं म्हणणं ऐकून ती काही काळ थांबली होती. पण चांगदेवाच्या समाधीनंतर त्या दोघांचा मुक्काम या पूर्णेच्या परिसरातच होता आणि काल... काल दोघं जण पूर्णेच्या काठावर बसलेली असताना अचानक मुक्ता उठते काय, पात्रात शिरते काय, विजेचा लोळ येतो काय आणि मुक्ता त्यात लुप्त होते काय! सगळंच अकस्मात आणि अतर्क्य होतं.

पाठीवर हात फिरवून सांत्वन करणाऱ्या नामदेवाच्या मिठीतून स्वत:ला


सोडवत निवृत्तीनं डोळे पुसले आणि म्हणाला, ''नामदेवा, एवढीशी होती रे मुक्ता! दोन-अडीच वर्षांची होती आई-बाबा गेले तेव्हा. 'आई' या शब्दाखेरीज तिला काही म्हणायलाही यायचं नाही. नुकतंच 'बाबा,' 'दादा' असं उच्चारायला लागली होती. आई-बाबा गेले नि तिला उच्चारता येणाऱ्या तीन शब्दांपैकी दोन शब्द निरर्थक झाले. नि:साद झाले. तिनं हाका मारल्या, 'आई', 'बाबा' म्हटलं तरी तिला कोण साद देणार होतं रे? मग राहता राहिला 'दादा'! आणि तो मी होतो. आई-बाबा गेले. झोपडीत दिसेनात. सुरुवातीला तीन-चार दिवस मुक्ता सगळीकडे शोधत होती. 'आई', 'बाबा' अशा हाका मारत सगळीकडे हिंडायची. पण, नामदेवा, तुला सांगतो, तिनं 'आई' म्हणून हाक मारली तरी मी 'ओऽ' द्यायचो. 'बाबा' म्हणाली तरी, 'काय गं मुक्ते?' म्हणत मीच पुढं यायचो. मग तिच्या लक्षात आलं, की आता 'आई', 'बाबा', 'दादा' काहीही हाक मारली तरी दादाच पुढे येतोय. आणि काय सांगू नामदेवा तुला, ती इतकी हुशार, की तिनं त्या चार दिवसांनंतर आई-बाबा अशी हाक मारायचं सोडूनच दिलं बघ. आणि मग सतत 'दादाऽ दादा'चा जप सुरू झाला. दोन-तीन दिवस असेच गेले रे आई-बाबांना शोधण्यात. ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता सगळीच लहान होती. मीच तेवढा थोडा मोठा होतो. माणूस मरतो म्हणजे संपतो, तो परतून कधीही येत नाही, हे मला समजत होतं; थोडंसं ज्ञानेश्वरालाही. आई-बाबा गेले आणि मी एकदम मोठाच झालो रे! मला तसं व्हायचं नव्हतं; पण मी झालो. एकदम मोठा झालो. अरे तीन लहान भावंडांचा मी दादा होतो रे! आणि आता आई-बाबासुद्धा झालो होतो. बारा-तेरा वर्षं ही भूमिका मी निभावली. नामदेवा, आता ही तिघंही समाधिस्थ झाली. माझ्यापासून दूर गेली. खूप दूर! न परतीच्या वाटेवर आणि आता मी एकटा राहिलो. एकटा! गहिनीनाथांचा हा शिष्य, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताचा मोठा भाऊ निवृत्तीदादा आता एकटा राहिला, नामदेवा. आता मलाही माझी वाट निवडली पाहिजे. माझ्या वाटेवरचे काटे दूर करून तिथं फुलं पसरायला ही तिघं पुढं गेली आहेत. मलाही बोलावतायत. नामदेवा, माझी वाट बघत असतील ना ते?''

निवृत्तीचं भान हरपलं होतं. गेल्या चार-सहा महिन्यांत एका पाठोपाठ एक धाकटी तीन भावंडं आणि भावाप्रमाणे असणारा चांगदेव यांच्या समाधिस्थ होण्यानं घायाळ झालेला, मनाच्या भळाळत्या जखमा सहन करू न शकलेला,

तीन भावंडांच्या वियोगानंतर एकटा मागे राहिलेला निवृत्ती भान हरपून बोलत होता. ना तो बोलायचा थांबत होता, ना त्याचा हुंदका! नामदेव, चोखोबा, गोरोबा, सगळे जण सुन्न अवस्थेत त्याच्याजवळ बसले होते. निवृत्तीच्या पाठीवरून हात फिरवून त्याचं सांत्वन करण्यापलीकडे एकही शब्द कोणाच्या तोंडून फुटत नव्हता. सगळ्यांचे डोळे मुक्ताच्या तशा अकस्मात जाण्यानं पाझरत होतेच. काल... कालच दुपारी जेवणाच्या वेळी 'पर्णावली' मांडताना मुक्ता म्हणाली होती, ''नामदेवा, माणसांचं आयुष्यही या 'पर्णावली'सारखंच असतं ना? सात पानं एकत्र जोडून 'पर्णावली' तयार होते. तसंच आई-वडील-बहीण-भाऊ- पती-पत्नी-मुलं अशी सात नाती मिळून माणसांचं आयुष्य बनतं. नामदेवा, बघितलंस? यांतलं प्रत्येक पान दुसऱ्या पानाला बारीकशा काडीनं जोडलेलं आहे, आणि ही काडी म्हणजे प्रत्येक व्यक्तीचं दुसऱ्या व्यक्तीशी असलेलं भावनिक नातं. नामदेवा, हे नातं, ही काडी जोपर्यंत शाबूत आहे, जोडलेली आहे, तोपर्यंतच माणसामाणसांतलं हे नातं टिकून राहतं. एकदा ही काडी मोडली, की ही पानं जशी विलग होतात, वेगवेगळी होतात, तशीच माणसंही वेगळी होतात. भावनिक नातं संपलं की प्रत्येक जण आपापला असतो, नामदेवा! मनुष्य एकटाच येतो आणि एकटाच जातो हे जरी खरं असलं, तरी या येण्या-जाण्याच्या मधल्या टप्प्यात तो अनेकांशी भावनेने जोडलेला असतो. माणसाचं आयुष्य आणि या पर्णावली तशाच जोडलेल्या अखंड राहाव्यात म्हणून दोन पानांना जोडणारी काडी जपणं फार महत्त्वाचं असतं नामदेवा!' जेवणासाठी पर्णावली मांडताना मुक्ताईनं नामदेवाला हे ऐकवलं होतं आणि आता स्वत:च्याच आयुष्याची काडी मोडून, सगळ्यांशी असलेलं भावनिक नातं तोडून ती अंतर्धान पावली होती. कसं आणि काय बोलून निवृत्तीचं सांत्वन करावं, हे नामदेवाला कळेना. नामदेवालाच काय, कुणालाच कळेना. काही न बोलता नामदेव नुसताच निवृत्तीच्या पाठीवरनं हात फिरवत राहिला. त्याचा पाठीवरनं फिरणारा हात पकडून निवृत्ती म्हणाला, ''नामदेवा, तू माझी समजूत काढू पाहतोयस. मी स्वत: माझं सांत्वन करू पाहतोय.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# उपचार तन मनाचे

**जो मर्चंट** अनुवाद : **श्रीनिवास वैद्य**

*मन आणि शरीर यांच्यावर एकत्रितपणे केल्या जाणाऱ्या उपचारांबद्दलची सर्वांगीण माहिती*

### कशाचाही परिणाम का होत नाही?

न्यू हॅम्पशायरमधल्या बेडफोर्ड इथे राहणाऱ्या पार्कर बेकचा दुसरा वाढदिवस झाला, तेव्हा तो एक अतिशय खेळकर असा मुलगा होता. त्यानंतर काही महिन्यांनी मात्र तो हळूहळू कोशात जाऊ लागला. पार्करचे हसणे थांबले, तो स्वत:च्या आई-वडिलांशी बोलेनासा झाला आणि त्यांच्या

कोणत्याही कृतीला प्रतिसाद देईनासा झाला. बरेचदा रात्री झोपेतून उठून तो विचित्र आवाजात आणि तारस्वरात किंचाळत असे. एकच कृती वारंवार करण्याची म्हणजे स्वत:भोवती गोलगोल फिरण्याची आणि स्वत:च्याच डोक्यावर जोरात हात मारून घेण्याची सवय त्याला जडली. त्याचे आई-वडील – व्हिक्टोरिया व गॅरी – त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेले आणि त्याला तपासल्यावर डॉक्टरांनी नेमके तेच सांगितले, ज्याची व्हिक्टोरिया व गॅरीला भीती वाटत होती. त्यांच्या मुलामध्ये आत्ममग्नतेची (Autism) सगळी लक्षणे अगदी नेमकेपणाने दिसत होती. उपलब्ध असलेले सर्वोत्कृष्ट उपचार व्हिक्टोरिया आणि गॅरी यांनी आपल्या मुलासाठी करून घेऊनही पार्करची तब्येत दिवसेंदिवस बिघडतच चालली होती. एप्रिल १९९६ पर्यंत, म्हणजे पार्कर तीन वर्षांचा होईपर्यंत, हे सगळे सुरू होते. त्यानंतर काहीतरी आश्चर्यकारक घडले.

ऑटिझम झालेल्या मुलांच्या बाबतीत जसे घडते, त्याप्रमाणे पार्करलाही पचनसंस्थेचे विकार होऊ लागले. त्यातच त्याला अगदी तीव्र स्वरूपाचा अतिसारही झाला. म्हणून व्हिक्टोरियाने त्याला मेरीलँड विद्यापीठात काम करत असलेल्या करोली होरवाथ (Karoly Horvath) या आतड्यांच्या विशेषज्ञांकडे तपासण्यासाठी नेले. त्यांच्या सल्ल्यानुसार पार्करची एंडोस्कोपी नावाची नेहमी केली जाणारी एक तपासणी करून घेतली. ही तपासणी करण्यासाठी टोकाला एक कॅमेरा लावलेली एक लवचीक नळी पचनमार्गात घालतात. पार्करची ही तपासणी केल्यावर त्यातून काही विशेष निष्पन्न झाले नाही; पण दुसऱ्याच दिवसापासून त्याच्या तब्येतीत अगदी नाट्यमय म्हणावी अशी सुधारणा दिसू लागली. त्याच्या पचनसंस्थेचे काम खूपच सुधारले; रात्री त्याला शांत झोप लागू लागली आणि हसणे, डोळ्याला डोळा देणे अशा मार्गांनी तो पुन्हा इतरांशी संवाद साधू लागला. तो बोलायचा अजिबातच थांबला होता, त्याऐवजी थोडेफार बोलू लागला. त्याला एखादे फ्लॅशकार्ड दाखवले तर त्याचे नाव तो उच्चारू लागला. जवळजवळ वर्षभरानंतर त्याने आपल्या आई-वडिलांना हाका मारल्या.

आत्ममग्नता म्हणजेच ऑटिझम या विकारात भाषा, बोलणे आणि इतरांशी केल्या जाणाऱ्या परस्पर क्रिया – प्रतिक्रिया यांच्याशी संबंधित बऱ्याच प्रकारचे बिघाड त्या व्यक्तीमध्ये निर्माण झालेले दिसतात. युनायटेड

स्टेट्समधील सुमारे पाच लाख मुले या विकाराने ग्रस्त आहेत. काही मुलांमध्ये जन्मापासूनच वाढीत कमतरता असल्याची लक्षणे दिसून येतात, तर इतर मुले पार्करप्रमाणे सुरुवातीला चांगली असतात; पण नंतर ती मुले मागे पडू लागतात. काही लक्षणे औषधांनी कमी होतात. शैक्षणिक आणि वर्तणुकीशी संबंधित उपचारांनी (मुलांसाठी तसेच पालकांसाठी) बराच फरक पडल्याचे दिसून येते; परंतु पूर्णत: बरे करणारे उपचार किंवा औषधे अजून सापडलेली नाहीत. पार्करमध्ये झालेले बदल म्हणजे व्हिक्टोरियाच्या मते चमत्कारच होता.

पार्करची एंडोस्कोपी करताना जे काही केले होते, त्यातील प्रत्येक टप्प्याचे सगळे तपशील व्हिक्टोरियाने रुग्णालयातील अधिकाऱ्यांचा पिच्छा पुरवून मागून घेतले. अगदी त्याला भूल देण्याच्या औषधाची मात्रा किती होती, इथपर्यंत बारीकसारीक माहिती तिने गोळा केली. त्यानंतर एक एक मुद्दा गैरलागू ठरवत ती अशा निष्कर्षाला पोहोचली की, पार्करच्या पचनसंस्थेत सिक्रीटिन नावाचे संप्रेरक (हॉर्मोन) एंडोस्कोपी करताना सोडले होते, त्याचा परिणाम होऊन त्याच्या तब्येतीत सुधारणा झाली. या संप्रेरकामुळे स्वादुपिंडाला (पँक्रिअस) उत्तेजना मिळून ते पाचकरस निर्माण करू लागते. स्वादुपिंडाचे काम व्यवस्थित सुरू राहावे यासाठी हे संप्रेरक पार्करच्या शरीरात सोडले होते. एंडोस्कोपी करण्याच्या पद्धतीतील तो एक भाग आहे. व्हिक्टोरियाचे असे मत होते की, तिच्या मुलाच्या पचनसंस्थेतील बिघाड आणि त्याच्या शरीरातील ऑटिझमची लक्षणे यांच्यात काहीतरी परस्परसंबंध होता आणि त्यावरून तिने असा निष्कर्ष काढला की, त्या संप्रेरकामुळे त्याच्यात अशी नाट्यमय सुधारणा झाली होती.

पार्करला सिक्रीटिनचा आणखी एक डोस द्यावा यासाठी व्हिक्टोरियाने जंगजंग पछाडले. आपल्याला सुचलेले सगळे विचार कळवण्यासाठी तिने मेरीलँड विद्यापीठातील शरीरवैद्यकातील तज्ज्ञ डॉक्टरांना पत्रे लिहिली, फोन केले; परंतु त्यांच्यापैकी कोणीही तिच्या म्हणण्यात रस दाखवला नाही. तिने पार्करची प्रगती दाखवणारे व्हिडिओ घरी तयार करून ते देशभरातील सगळ्या डॉक्टरांना तसेच ऑटिझम या विकारावर संशोधन करणाऱ्या सगळ्या संशोधकांनाही पाठवले. शेवटी नोव्हेंबर १९९६ मध्ये ही सगळी कहाणी इर्वाइन येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात मानस

औषधनिर्माणशास्त्राचा (सायकोफार्माकॉलॉजी) साहाय्यक प्राध्यापक या पदावर काम करणाऱ्या केनेथ सोकोल्स्की याच्यापर्यंत पोहोचली. त्याचा मुलगा आरोन ऑटिझमने आजारी होता. सोकोल्स्कीने पचनसंस्था या विषयातील एका स्थानिक विशेषज्ञाला गळ घालून आरोनचे तेच शारीरिक परीक्षण करून घेतले. त्याचा मुलगाही त्यानंतर डोळ्याला डोळा भिडवू लागला आणि काही शब्द पुन:पुन्हा उच्चारू लागला.

हे पाहिल्यावर मेरीलँड विद्यापीठातील होरवाथ यालाही आणखी एका मुलाच्या बाबतीत सिक्रीटिनचा हाच प्रयोग करून पाहावा असे वाटले. त्याने तसे केल्यावर त्या मुलाच्या बाबतीतही तेच घडले. आता होरवाथने पार्करला आणखी एक डोस दिला आणि आपल्या मुलाची आणखी एकदा जोरदार प्रगती झाल्याचे व्हिक्टोरियाला दिसून आले. या तीन मुलांच्या बाबतीत सिक्रीटिनमुळे जे अनुभव आले, त्याबद्दल होरवाथने एका वैद्यकीय नियतकालिकात १९९८ मध्ये एक अहवाल लिहिला. त्यात त्याने असा दावा केला होता की, 'समोरच्या व्यक्तीकडे थेट पाहणे, सजगता आणि भाषेतून होणारी अभिव्यक्ती या बाबतींत त्या मुलांमध्ये आश्चर्यजनक सुधारणा झाली होती.'[१]

वैद्यकीय उपचारांसाठी सिक्रीटिनचा वापर करण्यास परवानगी नसल्यामुळे होरवाथने त्यानंतर पार्करला सिक्रीटिनचे डोस देण्यास नकार दिला; परंतु शेवटी व्हिक्टोरियाला असा एक डॉक्टर भेटलाच की, ज्याला पार्करवर उपचार करण्याची इच्छा होती. पुढे ७ ऑक्टोबर, १९९८ रोजी त्याची सगळी कहाणी 'एनबीसी डेटलाइन' या कार्यक्रमातून लक्षावधी प्रेक्षकांसमोर आली. त्या कार्यक्रमात काही व्हिडिओ दाखवले गेले. पार्कर हळूहळू कसा एक खेळकर, सगळ्यांमध्ये मिसळणारा मुलगा झाला आहे, असे त्या व्हिडिओंमधून दाखवले गेले होते. पार्करची झालेली प्रगती पाहून ज्या पालकांनी आपल्या मुलांनाही त्या संप्रेरकाचे डोस दिले होते, त्या पालकांची खास मुलाखतवजा साक्ष त्या व्हिडिओमध्ये दाखवली होती. एका आईने सांगितले, 'सिक्रीटिनचा डोस दिल्यानंतर तो आता तुमच्याकडे नीट पाहतो, बोलतो, त्याला होणारा अतिसाराचा त्रास थांबला आहे, शी-शू कशी आणि कुठे करावी हे त्याला नीट कळते. तो आता म्हणतो, 'बघ, बाहेर किती छान आहे.' दुसऱ्या आईने म्हटले, 'तो माझ्याकडे थेट आणि व्यवस्थित

पाहत होता, जणू काही त्याला म्हणायचे होते, आई, तू मला वर्षभरात दिसलीच नाहीस.'[२] डेटलाइन या कार्यक्रमात असे सांगितले गेले की, ऑटिझम झालेल्या २०० मुलांना या संप्रेरकाचा डोस दिला होता, त्यांच्यापैकी निम्म्याहून अधिक मुलांमध्ये चांगली सुधारणा दिसून आली.

'यूएसए'मध्ये फक्त फेरिंग फार्मास्युटिकल्स याच कंपनीला सिक्रीटिन तयार करण्याची परवानगी होती. ती कंपनी फक्त दोनच आठवड्यांमध्ये विकली गेली. इंटरनेटच्या माध्यमातून हजारो डॉलर्स किमतीला सिक्रीटिनचे डोस विकले गेले. इतकी प्रचंड किंमत देणे शक्य व्हावे किंवा मेक्सिको अथवा जपानमधून काळ्या बाजारामध्ये ते विकत घेता यावे, म्हणून काही कुटुंबांनी स्वत:ची घरे गहाण ठेवल्याच्या कहाण्या सगळीकडे पसरल्या. पुढील काही महिन्यांमध्ये अडीच हजारांहून अधिक मुलांना सिक्रीटिनचे डोस दिले गेले आणि त्यामुळे ऑटिझममुळे आजारी असलेल्या मुलांमध्ये कशी सुधारणा होऊ लागली, त्याच्या गोष्टी लोक एकमेकांना सांगू लागले.

नॉर्थ कॅरोलिनामधील ॲशव्हिल येथे असलेल्या 'ओल्सेन हफ सेंटर फॉर चाइल्ड डेव्हलपमेंट' या संस्थेत काम करणाऱ्या अड्रियन सॅण्डलर या बालरोगतज्ज्ञाला अजूनही आठवते की, 'तेव्हा प्रचंड खळबळ निर्माण झाली होती. आमचे फोन कायम वाजतच होते, कारण ऑटिझम झालेल्या ज्या मुलांवर आम्ही उपचार करत होतो, त्या मुलांच्या पालकांना स्वत:च्या मुलावर सिक्रीटिन वापरून उपचार करून हवे होते.'[३] परंतु वैद्यकीय क्षेत्रातील मंडळींना अशी चिंता होती की, यातून कदाचित एखादे सार्वत्रिक आरोग्यविषयक संकट उद्‌भवेल. सिक्रीटिनचे एकापाठोपाठ एक डोस देण्याने ऑटिझमवर योग्य दिशेने उपचार होणे तर सोडाच; पण तसे करणे त्या रुग्णाच्या दृष्टीने सुरक्षित आहे का, याबद्दलही कोणतीच ठोस माहिती उपलब्ध नव्हती; त्यामुळे अशा डझनभराहूनही अधिक वैद्यकीय चाचण्या देशभरातील वेगवेगळ्या वैद्यकीय केंद्रांमध्ये तातडीने घेण्याचे ठरवले गेले. सॅण्डलरच्या नेतृत्वाखाली ऑटिझम हा आजार जडलेल्या ६० मुलांवर अशा प्रकारची पहिली नियंत्रित चाचणी घेतली गेली. या चाचणीचे निष्कर्ष जाहीर केले जाणार होते.

◆

## नवी संहिता... नवा आशय...


# द हिडन हिंदू

तीन कथांच्या मालिकेतील भाग तिसरा

**अक्षत गुप्ता**

अनुवाद

**मुक्ता देशपांडे**




देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या, अल्पावधीत बेस्ट सेलर ठरलेल्या 'द हिडन हिंदू' मालिकेचा तिसरा भाग आता मराठीत


**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# विद्रोह

**हेन्री डेन्कर**

अनुवाद


**लीना सोहोनी**




न्यायालयीन कामकाजातल्या उत्कंठावर्धक घडामोडी मांडत नेमकं सामाजिक भाष्य करणारी कादंबरी

**किंमत : २९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून







**रवींद्र भगवते**

*बहुरंगी माणसांच्या बहुढंगी कथा*

### बाक

तो बाक मला पूर्वीपासून आवडायचा. त्या बाकावर येऊन बसावं, असं वाटायचं; पण वेळ मिळत नसे. आता वेळच वेळ... निवृत्त झालोय. सकाळची सगळी कामं उरकून अंघोळबिंघोळ करून बाकावर येऊन बसायचो. तसा बसलो होतो.

रस्ता वाहतोय. माणसं, मोटारी, दुचाक्या, सायकली... सगळे कुठूनतरी आलेत आणि कुठेतरी चाललेत. असंख्य पाय या रस्त्यावर इकडे-तिकडे जाताहेत. रस्ता तिथेच आहे. त्याला सोयरसुतक नाही. माणसं फिजिकली माझ्यासमोरून चालताहेत. मेन्टली कुठे आहेत? कोणी ऑफिसमध्ये, शाळेत, कॉलेजात, दुकानात, बाजारात कोणी कामाच्या शोधात.

कुत्रे काही खायला मिळतं का ते शोधत आणि अधूनमधून निर्विकारपणे सगळ्यांकडे पाहत उभे आहेत.

मला कुठेच जायचं नाहीए. काहीही शोधायचं नाहीए. मला दोन वेळा खायला मिळेल आणि दोन-तीन वेळा चहा-बिस्किटं मिळतील, एवढं पेन्शन माझ्या सरकारी नोकरीनं दिलंय.

मी बाकावर बसून आहे. जणू पृथ्वीच्या मध्यभागी आणि भोवती सगळी पृथ्वी फिरतेय... मी मात्र स्थिर.

स्थैर्य हा शाप की वरदान?

विचारचक्र थांबत नाही.

मेंदूत जणू थैमान आहे... कसलं माहीत नाही; पण काहीतरी होतंय. कॉम्प्युटरच्या आतमध्ये काय उलथापालथ होत असेल? कसे दिसत असतील

सगळे प्रोग्राम्स? या थैमानाला दिशा हवी. थैमानाला दिशा नसली, तर वावटळ उठेल आणि मेंदूच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील.

मी बाकावर बसून आहे. मला काहीतरी जाणवतंय.

कोणीतरी माझ्याकडे टक लावून बघतंय... माझ्या सहाव्या ज्ञानबिंदूला कळतंय... कोणीतरी बघतंय... परस्पर माझ्याकडे... मी शोध घेतोय... कोण बघतंय माझ्याकडे?

...सापडलं.

नक्की तीच.

ती बाई.

पन्नास-पंचावन्नची असेल?

पण तीच... नक्की.

समोर एक चाळ आहे. चाळीला कॉमन गॅलरी आहे. दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरीत ती उभी आहे. जाडगेली... गोरटेली.

चाळीच्या लाकडी कठड्यावर आपली दोन्ही कोपरं ठेवून माझ्याकडे

एकटक पाहत ती उभी आहे.

ती का पाहतेय माझ्याकडे? ...असं एखाद्या पुरुषाकडे एकटक पाहणं चांगलं नाही, हे तिला कोण सांगेल? पण आपणही पाहू लागलोय आता तिच्याकडे. रस्त्यावर असं बाकावर बसून समोरच्या चाळीत दुसऱ्या मजल्यावर उभ्या असलेल्या बाईकडे पाहणं चांगलं नाही, हे मला मीच सांगतोय. कळतंय पण वळत नाही.

खिशात हा मोबाइल का ठेवला मी? चांगला बघत होतो तिच्याकडे तर वाजला. नुसता वाजला नाही, तर थरथरलासुद्धा.

"बाबा... कुठे आहात?" सून विचारत होती.

"आणखी कुठे? बाकावर."

"घरी या... बोंबील तळलाय."

सून ममताळू आहे. बापासारखं सासऱ्याचं करते. आता जायलाच हवं.

ममताळू सून आणि तळलेला बोंबील... जायलाच हवं.

मी आलोय. रस्त्यानं माझ्याशी हस्तांदोलन केलं. बाकानं ॲडजस्ट करून स्वत:च्या मांडीवर मला सामावून घेतलं.

आता ओळख झालीय नं आमची.

बसल्यावर समोर पाहिलं.

समोर ती उभी आहे... पाहतेय... थांब... मी काय घाबरतो काय?...मीसुद्धा पाहतो. आज तिनं अंजिरी रंगाची साडी नेसलीय.

आपल्याला अंजिरी रंग आवडतो, हे तिला कसं कळलं?...ना ओळखीची ना पाळखीची.

पण हे ट्यूनिंग छान आहे.

माझा या बाकड्यावर जीव, तर तिचा कठड्यावर.

मी इथून धनुष्यबाण खेचलेला. तिनं तिथून...

पण अजून बाण सोडलेला नाही... दोघांनीही... हा मजेदार खेळ आहे. बघ किती बघतेस तेवढी.

मीसुद्धा बघतो.

रिटायर्ड माणसांनी बाईकडे बघायचं नाही, असा काही नियम नाही... त्यातून विधुर असेल तर काय?

अरे, पण ती आत का गेली? असा खेळ सोडून जाताना निदान 'टाइम प्लीज'ची ॲक्शन तरी करायची. मीसुद्धा एकदा रस्त्याच्या खांद्यावर थोपटलं. जाणारी-येणारी माणसं निर्विकारपणे बघून घेतली. बाकानंही तेवढ्यात मांडी बदलली आणि मी पुन्हा धनुष्य-बाण दुसऱ्या मजल्याकडे वळवला.

ती आता पुन्हा आलीय... पण हात कठड्यावर नाहीत; कारण तिच्या हातात काहीतरी काळंकाळं आहे. ते तिनं आता डोळ्यावर लावलं आहे.

म्हणजे ती मला आता दुर्बिणीतून बघतेय.

धिस इज टू मच... ती आपल्या एक स्टेप पुढे जातेय, भलतीच धीट आहे.

खिशातला मोबाइल थरथरतोय.

हा मोबाइल साला दुष्मन आहे.

आणि ममताळू सून दुसरी दुष्मन. तिच्या ममतेसकट. मी मोबाइलचं थरथरणं मुठीत दाबलं. आज तिनं सुरमई तळली असणार.

आता निघायला हवं... आणि घरात एका कोपऱ्यात कुठेतरी दुर्बीण आहे... ती शोधायला हवी.

आज रस्ता मी आल्यावर जरा जास्तच सुखावला. आज बीएमसीनं त्याला अंघोळ घातली होती. बाकड्यानं तर मला खेचूनच स्वतःच्या मांडीवर बसवलं.

ती समोर आहेच. वाटच बघत असते जणू. तिनं आजही दुर्बीण डोळ्याला लावलीय.

आपणही काढू या की आपली दुर्बीण... रस्त्याला विचारलं तर म्हणाला, 'बिनधास्त काढ. जवळ कोणी हवालदार नाही आणि माणसांना कुठे वेळ आहे तुझ्याकडे बघायला.'

चला ...शबनममधून दुर्बीण काढून डोळ्याला लावू या.

आता दोन माणसं एकमेकांना समोरासमोरून म्हणजे एक जण रस्त्यावरून, तर दुसरी दुसऱ्या मजल्यावरून दुर्बिणीनं एकमेकांना बघताहेत.

रस्ता मिश्कील हसतोय, बाकडं तर टाळ्या वाजवतंय.

"ए बाई, ती दुर्बीण जरा बाजूला करशील तर चेहरा दिसेल की तुझा?"

तिनं आता दुर्बीण बाजूला केलीय. ऐकलं की काय?

‘‘ओह् माय गॉड! चेहरा ओळखीचा वाटतोय; पण लक्षात येत नाहीए... ती तर आता चक्क हातानं बोलवतेय... जाऊ या का?...नको... कानाखाली वाजवली तर?’’

आज नको जाऊ या... आज नुसता हात करू या आणि आठवायचा प्रयत्न करू या.

दुष्मन थरथरतोय खिशात... सूनबाईला म्हणावं, ‘‘पापलेट, सरंगा असला तरी नको बोलवूस.’’

पण आता जायलाच हवं. नुसता हात हलवून निघावं... आणि रात्रभर आठवायचा प्रयत्न करू या.

आज रस्त्यानं माझं धावत येऊन स्वागत केलं. बाकानं बसवलं खरं; पण काखेत हात घालून उठवतोय कशाला हा?

रात्रभर आठवलं... तरी आठवलं नाही.

ती उभी आहे. जोरजोरात हात करून बोलवतेय.

मी निघालोय... तिच्या दिशेनं... आपण त्या चाळीत शिरतोय... जिना वर जातोय... पण मग आपण कुठेतरी भूतकाळात शिरतोय असं का वाटतंय?

आपण कॉमन गॅलरीत आलोय. तिनं हसून स्वागत केलंय. ती चक्क आत बोलवतेय.

‘‘ओळखलंच नं शेवटी? ...मला वाटलंच होतं तूच असशील.’’

मी कुठे ओळखलंय... मी नीट पाहतोय.

आणि मी ओळखलंय.

साक्षात्कार म्हणतात, तो हाच असावा.

‘‘कुमुद ना?’’ मी चित्कारलो.

‘‘बरोब्बर... विसरला नाहीस हं!’’

यस... ही तर कुमुद पारसनीस... कॉलेजमधली... किती लाइन मारायचो आपण हिच्यावर... आपणच काय आपली गँगच... अख्खं कॉलेजच... आयटेम होती; पण कोणाच्या ताकास तूर लागू दिला नाही.

‘‘तू कसं ओळखलंस मला?’’

‘‘अरे, तो बाक रोज बेवारशी असायचा... भिकारीबिकारी बसायचे

तिथे. एक दिवस बघितलं तर तू बसलेला. म्हटलं हा बरा माणूस इथे कसा?...मग टक लावून बघितलं... म्हटलं केस उडलेत; पण दिसतोय तर वसंतासारखाच. मग शेजारच्याची दुर्बीण उधार घेतली. खात्री केली. म्हटलं हा शंभर टक्के वसंताच... मग बोलवलं... कसा आहेस?''

''मी चांगला आहे की... रिटायर झालोय सरकारी नोकरीतून... टाइमपास म्हणून बाकावर बसतो... रोज सकाळी.''

''माहितीए... रोज येतोस आणि माझ्याकडे बघत बसतोस.''

''ते काय ...ओळख पटत नव्हती म्हणून.''

''आता पटली ना... मग झालं तर... चहा घेतोस ना?''

''नको... ॲसिडिटी होते.''

''मग लिंबू सरबत घे.''

ती आत गेलीय... दोनच खोल्या... चाळीतल्या... बाहेरच्या खोलीत एक ऐसपैस पलंग... आपण त्या पलंगावरच बसलोय... पलंगासमोर दोन खुर्च्या. त्यापैकी एका खुर्चीवर ती मघाशी बसली होती. घरात कोणा पुरुषाचे कपडे दिसत नाहीत. नवरा आहे का तिचा? मंगळसूत्र तर आहे. मुलं बहुतेक नसावीत. म्हणजे ही एकटीच आहे?


कॉलेजमध्ये होती, तेव्हा काय रुबाब होता हिचा. गोरी, सडसडीत, चुणचुणीत, तरतरीत... साली तेव्हा आमच्या गँगला खिजगणतीत ठेवत नसे. त्या श्रीराजच्या बाइकवरून यायची. श्रीराज बड्या बापाचा ना. हिनं पटवलेला. आमची गँग बिचारी हिला आपल्या कवितांमध्ये वगैरे पेरायची. चार वर्षं मी फक्त हिचाच विचार करत होतो. चाळीभोवती फेऱ्या मारायचो. रात्ररात्र तळमळत होतो; पण त्या नटरंग्या श्रीराजनं हिला काय भुरळ घातली होती कोणास ठाऊक?

ती आतमध्ये लिंबू शोधतेय. फ्रिजमध्ये मिळालं नाही बहुतेक. दरवाज्याच्या मागच्या खुंटीवरच्या पिशवीत शोधतेय. आपल्याला पाठमोरी दिसतेय. जाडी... अजागळ... केसही पिकलेत... लिंबू मिळालेलं दिसतंय...ती विळीवर उकिडवी बसून आता लिंबू चिरतेय... ग्लासमध्ये पिळतेय... सरबत तयार होतंय. ती ग्लासमध्ये ओतून ग्लास घेऊन बाहेर येतेय.

''घे... झालं पण सरबत.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# अॅन आयलंड

**कॅरन जेनिंग्ज** अनुवाद : **संकेत दि. लाड**

*एकांड्या आयलंडवरचा एकटा माणूस...त्याच्या अस्मिता आणि एकांताच्या जुगलबंदीतला अस्वस्थ करणारा संघर्ष.*

बेटाच्या किनाऱ्यावरील विखुरलेल्या सागरगोट्यांवर लाटांबरोबर तेलाचा ड्रम वाहत येण्याची ही पहिलीच वेळ होती. इतक्या वर्षांमध्ये इतर बऱ्याच वस्तू इथपर्यंत येऊन पोहोचल्या होत्या. त्यांमध्ये फाटके शर्ट होते, दोरखंडांचे तुकडे होते, जेवणाच्या प्लॅस्टिकच्या डब्यांची तुटकी झाकणं होती आणि केसांना जोड द्यायला बनवलेल्या

सिन्थेटिकच्या वेण्या होत्या. आजच्यासारखे काही मृतदेहही यापूर्वी वाहत आले होते. हा मृतदेह त्या ड्रमच्या शेजारी पसरला होता. त्याचा एक हात पुढे लांबवलेला होता, जणू त्या ड्रमनं व मृतदेहानं एकत्रच हा समुद्रप्रवास केला असून, त्यांना एकमेकांपासून वेगळं होण्याची इच्छा नसल्याचं त्यातून सुचवायचं असावं.

त्या सकाळी दीपस्तंभाच्या मनोऱ्यातून खाली उतरत असताना सॅम्युअलनं एका लहानशा खिडकीतून प्रथम तो ड्रम पाहिला. त्याला जपून चालावं लागत होतं. या मनोऱ्याच्या दगडी पायऱ्या जुन्या-पुराण्या होत्या, झिजून गुळगुळीत झाल्या होत्या आणि त्यांचा खोलगट मध्यभाग त्याला ठेचकाळून पाडण्यासाठी टपलेला होता. सिमेंटमध्ये जिथं शक्य होतं, तिथं तिथं त्यानं लोखंडी हँडल बसवली होती, पण उर्वरित उतार हा दोन्ही हात लांबवून, आधारासाठी दोन्ही बाजूंच्या खरबरीत पृष्ठभागावर बोटं घासत उतरावा लागायचा.

तो ड्रम प्लॅस्टिकचा होता, कामगार लोक कपड्यांवर जो पोशाख चढवतात, तशा निळ्या रंगाचा होता आणि सॅम्युअल घाईघाईनं किनाऱ्यावर येईपर्यंत तो त्याच्या नजरेच्या टप्प्यातच लाटांच्या प्रवाहावर हिंदकळत होता. एकदा किनाऱ्यावर पोहोचल्यानंतर मग सॅम्युअलनं तो मृतदेह पाहिला. त्या मृतदेहाला बगल देत सॅम्युअलनं ड्रमच्या भोवतीने वर्तुळाकार प्रदक्षिणा घातली. राष्ट्राध्यक्षांसारखाच तो ड्रमही चांगलाच गोलमटोल होता आणि त्याला कुठंही तडा गेल्याचं किंवा भोकं पडल्याचं दिसत नव्हतं.

त्यानं काळजीपूर्वक तो ड्रम उचलला. तो रिकामा होता; त्याचं सील शाबूत होतं. आणि वजनाला हलका असला, तरी तो बोजड होता. आपल्या खरबरीत हातांनी त्या गुळगुळीत पृष्ठभागावर घट्ट पकड ठेवून तो आधी टोकदार, खडबडीत सागरगोट्यांवरून, मग किनाऱ्यावरील खडकांवरून आणि त्यानंतर वाळूच्या वाटेनं, झुडपं आणि गवतामधून दीपस्तंभाच्या शेजारीच असलेल्या त्याच्या बसक्या घराच्या आवारात नेणं सॅम्युअलला शक्य होणार नव्हतं. बहुधा, त्यानं जर दोरी आणून तो ड्रम आपल्या पाठीला बांधला असता, तर त्याला ती जुनीपुराणी लाकडी ढकलगाडी वापरणं टाळता आलं असतं. तुटक्या चाकामुळे ती गाडी त्या खडबडीत किनाऱ्यावर अडकत असे आणि बऱ्याचदा आपल्याच वजनाचा परिणाम

म्हणून पलटी होत असे.

हो, तो ड्रम पाठीवरून वाहून नेणं हाच सर्वोत्तम पर्याय ठरणार होता. त्यानंतर, सॅम्युअल त्याच्या अंगणात टाकून दिलेल्या व कुजणाऱ्या ओंडक्यांमध्ये पडलेली जुनी करवत शोधणार होता. तो तिच्या पात्यावरचा गंज घासून काढणार होता, ते पातं शक्य तितकं तीक्ष्ण बनवणार होता व त्यानं ड्रमचा वरचा भाग कापून काढणार होता. मग, आपल्या घराबाहेर जिथं नाला तुडुंब भरून वाहायचा, त्या कोपऱ्यात तो हा ड्रम ठेवणार होता, जेणेकरून त्याला आपल्या भाजीपाल्याच्या मळ्यामध्ये वापरण्यासाठी पावसाचं पाणी साठवता आलं असतं.

सॅम्युअलनं तो ड्रम तसाच पडू दिला. त्या खडबडीत पृष्ठभागावर तो ड्रम भेलकांडला आणि त्या मृतदेहाच्या हातावर जाऊन आदळला. सॅम्युअलला त्या मृतदेहाचा विसरच पडला होता. त्यानं सुस्कारा सोडला. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याला एक अख्खा दिवस लागायचा. संपूर्ण दिवस. पहिल्यांदा तो मृतदेह हलवणं, मग दफन करणं, जी अशीही या वाळूचा पातळ थर असलेल्या खडकाळ बेटावर अशक्यच गोष्ट होती. त्यानं यापूर्वी इतर मृतदेहांबाबत जे केलं होतं, त्याप्रमाणं या मृतदेहालाही दगडांनी झाकणं हा शक्य असणारा एकमेव पर्याय होता. आणि तरीही हा खूपच मोठा मृतदेह होता. रुंदीला नसला, तरी लांबीला मोठा होता. तो त्या ड्रमपेक्षा दुप्पट लांबीचा होता, जणू समुद्राच्या भरती व ओहोटीनं त्या मृतदेहाची विटंबना केल्यामुळे त्याला हे अनैसर्गिक, लांबलचक स्वरूप प्राप्त झालं होतं.

त्या मृतदेहाचे हात चांगले मजबूत होते आणि विवस्त्र धडाचा हाडं दिसणारा कणा व टोकदार बरगड्या यांच्याशी विजोड वाटत होते. दोन्ही खांद्यांच्या मागच्या बाजूला विरळ, काळी कुरळी लव होती आणि त्याच्या कमरेवर असलेल्या करड्या डेनिमच्या शॉर्ट्सजवळ पाठीच्या तळाशी थोडी अधिक दाट होती. अशीच विरळ आणि त्या माणसाच्या आकाराच्या मानानं अगदीच तुरळक दिसणारी कुरळी लव त्याच्या पायांवर, पायांच्या बोटांवर, दोन्ही बाहूंवर आणि अगदी त्याच्या बोटांच्या पेराच्या मधल्या जागेतही होती. त्यामुळे सॅम्युअल थोडासा अस्वस्थ झाला. ते केस एखाद्या नवजात प्राण्याचे किंवा गर्भाशयात खूप जास्त काळ राहिलेल्या अर्भकाचे

होते. या दगडांवर समुद्रानं हे नेमकं काय जन्माला घातलं होतं?

एव्हाना, सकाळचा सूर्य वर येत होता. खाऱ्या स्फटिकांसह त्या कुरळ्या लवीला रुपेरी झाक येत होती. त्या मृतदेहाचे केसही राखाडी होते आणि त्यांमध्ये वाळू अडकली होती. त्या माणसाच्या चेहऱ्यापैकी केवळ कपाळाचा थोडासा भाग आणि एक बंद डोळा इतकंच दिसू शकत होतं आणि त्यावरही वाळूचे कण चिकटले होते. त्याचा उर्वरित चेहरा खांद्यात रुतलेला होता.

'च्...च्...' सॅम्युअलच्या तोंडून उद्‌गार निघाले. या मृतदेहाला वाट पाहावी लागणार होती. प्रथमतः सॅम्युअल त्या ड्रमकडं लक्ष देणार होता आणि मग उद्या सकाळी, जर हा मृतदेह पुन्हा समुद्रात वाहून गेला नाही तर, सॅम्युअलला त्या बेटावरील काही खडक फोडावे लागणार होते आणि त्यातून त्या मृतदेहाला झाकण्याकरिता पुरेसे तुकडे तो तयार करणार होता.

या दीपस्तंभाचा रखवालदार म्हणून त्याच्या तेवीस वर्षांच्या कार्यकाळात आतापर्यंत बत्तीस प्रेतं वाहत आली होती. हे सर्व बत्तीस मृतदेह निनावी होते, बेवारस होते. सुरुवातीच्या काळात जेव्हा सरकार नवं होतं, आश्वासनांचा जोश होता, अजूनही सगळा सावळा गोंधळच होता आणि पाव शतकाच्या हुकूमशाहीच्या काळामध्ये मृत्युमुखी पडलेल्या आणि बेपत्ता झालेल्यांचा शोध अद्याप घेतला जात होता, तेव्हा सॅम्युअलनं या मृतदेहांविषयी माहिती दिली होती. पहिल्या वेळी तर अधिकारीही आले होते, त्यांनी सोबत क्लिपबोर्ड आणि मृतदेह भरायच्या डझनभर बॅगा आणल्या होत्या. मृतदेहांसाठी खणलेल्या खड्ड्यांचा, तसेच खडकांच्या मध्ये अडकून राहिलेल्या मृतदेहांच्या अवशेषांचा, येथील सागरगोट्यांनी भरलेल्या वाळूचा भाग झालेल्या हाडांचा व दातांचा शोध घेण्याकरिता त्यांनी संपूर्ण बेट पिंजून काढलं.

त्या वेळच्या प्रमुख महिला अधिकारी त्यांच्या त्या विशिष्ट लेदरच्या बुटांच्या टाचांवरील काही तरी घासल्याच्या खुणेकडं पाहत म्हणाल्या होत्या, ''तुम्ही हे लक्षात घ्या, की आम्ही आश्वासनं दिली आहेत. राष्ट्र म्हणून आपल्याला पुढे जाता यावं यासाठी आम्हाला हुकूमशहाच्या सत्ताकाळात यातना भोगलेल्या सर्वांना शोधून काढलंच पाहिजे. माझ्या सहकाऱ्यांना राजधानीबाहेरच्या एका मैदानात किमान पन्नास प्रेतं असलेली एक दफनभूमी

आढळली. दुसऱ्या एका सहकाऱ्याला जंगलामध्ये झाडांना लटकलेल्या सात लोकांचे अवशेष सापडले. ते अद्यापही लटकलेलेच होते. तुम्हाला समजतंय ना, या इतक्या काळानंतरही. इथं आपल्याला आणखी किती सापडतील, कुणास ठाऊक? पण ते बरेच असतील, अशी मला खात्री आहे. मृतदेह टाकून देण्यासाठी ही आदर्श जागा आहे.''

''असं तुम्हाला वाटतं?''

''हो नक्कीच, जरा आजूबाजूला पाहा.'' सभोवतालच्या परिसराकडं हात दाखवत त्या म्हणाल्या. ''इथं मैलोन्‌मैल कुणीच नाही. बघायला, ऐकायला किंवा काही करायला कुणीही नाही.'' त्यानंतर त्या पुढे वाकल्या आणि दबक्या आवाजात म्हणाल्या, ''कॉन्संट्रेशन कॅम्पप्रमाणं त्याच्या काही गुप्त छळछावण्या असल्याची चर्चा असल्याचं म्हणतात. त्याच्याशी मतभेद असणाऱ्यांना तो तिथं मरण्यासाठी पाठवत असे. अर्थात, हे पूर्णपणे खरं आहे का, या विषयी आम्हाला अद्याप माहिती नाही. आम्हाला त्याचे पुरावे सापडलेले नाहीत, पण ही जागा तशांपैकीच असू शकते, असं तुम्हाला वाटत नाही का? तुम्ही एखाद्याला मरायला पाठवाल, अशी ही जागा नाहीय का?''

सॅम्युअलनं त्यावर काही उत्तर दिलं नव्हतं आणि त्या महिला अधिकारी तोपर्यंत त्याच्याकडं पाठ फिरवून त्यांच्या पथकातील एका सहकाऱ्याला हाक मारत असतानाच आपल्या घड्याळावर हात मारत होत्या. ''शोधत राहा!'' पथकातील माणसाने नकारार्थी मान हलवल्यानंतर त्या म्हणाल्या. त्या पुन्हा सॅम्युअलकडं वळून म्हणाल्या, ''एकदा, आम्हाला मृतदेह सापडले, की घाव भरून येण्याच्या काळाला सुरुवात होईल, देशासाठी आणि आपल्या सर्वांसाठीही. तोपर्यंत आपल्या जखमा भरून येणार नाहीत. आपल्यासाठी ते मृतदेह गरजेचे आहेत.''

जेव्हा एकापाठोपाठ एक सर्व सहकारी रिकाम्या हातांनी परतले आणि दिवसभराचं काम दाखवण्यासाठी त्यांच्याकडं फक्त वाहून आलेला एकमेव मृतदेहच होता, तेव्हा त्या घाईघाईनं बोटीत चढल्या. कोणत्याही निरोपाच्या शब्दांची देवाणघेवाण किंवा अलविदा न करता त्या अचानकच निघून गेल्या. त्यांच्याकडून किंवा त्यांच्या विभागाकडून सॅम्युअलला काहीच कळवण्यात आलं नाही. त्या मृत मनुष्याचं काय झालं किंवा तो कोण

असण्याची शक्यता होती, हे सॅम्युअलला समजलंच नाही.

त्यानंतर काही महिन्यांनी, बहुधा वर्षभराने त्याला वाहत येऊन एकमेकांशेजारी पडलेले तीन लहान मृतदेह सापडले. त्यांपैकी एक लहान मुलगा होता, एक मुलगी होती आणि एक दुपट्यात गुंडाळलेलं बाळ होतं. त्या काळामध्ये दीपस्तंभाची रेडिओ संदेशवहन यंत्रणा अद्याप सुरू होती आणि त्यानं या विषयी माहिती देण्यासाठी किनाऱ्याशी संपर्क साधला होता. एका महिलेनं तिकडून त्याच्याशी पुन्हा संपर्क साधला. रेडिओमधील खरखरीमुळे तिचा आवाज कापला जात होता.

''त्यांचा वर्ण काय आहे?''

''काय?''

''त्यांचा वर्ण काय आहे? त्या मृतदेहांचा. कोणत्या वर्णाचे आहेत ते?''

त्यानं उत्तर दिलं नाही.

''मला हे विचारायचंय, की ते आपल्यापेक्षा गडद रंगाचे आहेत का – म्हणजे त्यांच्या त्वचेचा रंग – हे मला जाणून घ्यायचंय. ते तुमच्यापेक्षा किंवा माझ्यापेक्षा गडद वर्णाचे आहेत का?''

''मला असंच वाटतंय.''

''आणि त्यांचे चेहरे? ते उभट चेहऱ्याचे आहेत का? त्यांची गालफाडं कशी आहेत?''

''मला माहीत नाही. ती लहान मुलं आहेत आणि ती मुलांसारखीच दिसतात.''

''ऐका, आम्ही व्यग्र लोक आहोत. आमच्यासमोर हाताळण्यासाठी खरेखुरे गुन्हे आहेत. खरेखुरे अत्याचार, तुम्हाला समजतंय ना... दर वेळी जेव्हा दुसऱ्या एखाद्या देशाचे निर्वासित पळून जातात आणि बुडतात, तेव्हा आम्ही बेटावर नाही येऊ शकत. ती आमची समस्या नाहीये.''

''मग, मी यांच्याबाबत काय करावं? ''

''तुम्हाला जे हवं ते करा. आम्हाला ते मृतदेह नकोत.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# तवायफनामा

**सबा दीवान** अनुवाद : **डॉ. शुभदा कुलकर्णी**

*मनस्वी कलाकार ते अभिजात संगीत, नृत्याच्या अनभिषिक्त सम्राज्ञी, कालपटलावर नैतिकानैतिकाच्या संकोची चौकटीत जगणं हरवलेल्या तवायफांची हेलावून टाकणारी गाथा*

## धरमनबीबी आणि कुंवरसिंह

त्या भग्नावस्थेतल्या, ओसाड देवळाच्या कळसावर एक जीर्ण- शीर्ण तांबडं निशाण फडकतंय. दिवास्वप्नातल्या दृश्यासारखी डोळ्यासमोरून, मधून मधून लखकन हलणारी

२ ५

ही छोटी छोटी कैमूर टेकाडं सरळसपाट पठारांतून डोकावताहेत. भव्य विंध्याच्या रांगांपुढे ती अगदीच चिमुकली भासतात. या टेकाडांमधल्या उंचसखल रस्त्यांवरून आमची टॅक्सी धावतेय. मागच्या खिडकीतून बिहारच्या नैर्ऋत्येला लांबवर पसरलेली शुष्क पठारं दिसताहेत. पुढे, ड्रायव्हरजवळ बसलेला तुझा सतरा वर्षांचा भाचा, जावेद मागे वळून सांगतो, की या टेकाडांमध्येच माओवादी टोळ्या लपलेल्या असतात. बनारसपासून आपल्याबरोबर असणारा टॅक्सीड्रायव्हर, रमेश हे ऐकून थोडा अस्वस्थ होतो. त्याच्या मनातली चलबिचल त्याच्या चुळबुळण्यावरूनच कळते. पण त्यानं जराही विचलित न होता, तू कौतुकानं तुझ्या लाडक्या भाच्याकडे पाहत अभिमानानं ऊर भरून येऊन सांगतेस, ''माझा जावेद रोज वर्तमानपत्र वाचतो आणि टी. व्ही.वरच्या बातम्याही नियमितपणे, आवडीनं पाहतो''

मला माहितीये की जावेदला क्रिकेटचाही शौक आहे. त्याच्या वर्गातली मुलं त्याला सचिन तेंडुलकरच समजत असत. 'तो एक दिवस राज्यस्तरीय क्रिकेटमध्ये बॅटिंग करणार आणि सध्या मोडकळीस आलेल्या आपल्या भभुआ उच्च माध्यमिक शाळेला तिचा पूर्वलौकिक परत मिळवून देणार', असं भाकीत त्याच्या शिक्षकांनीही केलं होतं. पण जावेदची शाळा केव्हाच सुटली. त्याचे वडील, म्हणजे तुझ्या जुळ्या बहिणीचा, गफूरनचा नवरा नईम, रात्रंदिवस कष्ट उपसणारा एक गरीब शिंपी. दहा जणांचं कुटुंब पोसणाऱ्या नईमच्या मते क्रिकेट हा न परवडणारा, फजूल शौक आहे. त्याला असं वाटणं साहजिकच. केवळ असले शौक पुरवण्यासाठी मुलाच्या शालेय शिक्षणाचा खर्च त्याला कसा परवडणार? आणि तसंही, बारावी उत्तीर्ण झाल्यावर तरी पुढे काय, तर जावेद बहुतांशी त्याच्या वडलांना शिवणकामातच मदत करणार ना! मग ते काम आतापासूनच सुरू केलेलं बरं! तर जावेद आता बायकांचे ब्लाऊज शिवण्याचं काम करतो. मात्र जेव्हा जमेल तेव्हा, चोरून, वडलांचा डोळा चुकवून क्रिकेट खेळायलाही जातो. कशाला उगाच त्यांची नाराजी ओढवून घ्यायची! दैनंदिन आयुष्यात, त्याच्या रोजच्या कामात तो कितीही व्यग्र भासला, तरी त्याच्या डोक्यात वेगळेच विचार घोळत असतात. कधीतरी उठाव होतील आणि परिस्थिती बदलेल, अशी उमेद बाळगूनच जावेद जगतोय. ''माओवादी श्रीमंतांना लुटून, ती लूट गरिबांमध्ये वाटतात. उठाव होऊन क्रांती होत नाही, तोवर असे उद्रेक होतच राहणार. त्यानंतरच ते शांत होतील. हे माझं म्हणणं खोटं ठरणार

नाही, हे लक्षात ठेवा.''

बोलताना त्याच्या आवाजाला अशी काही विलक्षण धार येते! तशी तू काहीशी अस्वस्थ होतेस आणि लटक्या रागानं त्याला म्हणतेस, ''जावेद, उगाच नाही त्या गोष्टीत अडकून गोत्यात येशील. भलत्याच लोकांच्या संगतीत तर नाहीस ना तू? नसत्या फंदात पडू नकोस. तुझे वडील तुला फोडून काढतील, माहितीये ना तुला?'' अशा वेळी मात्र, आईच्या ममतेनं, तुझ्यातली प्रेमळ मावशी थोड्याशा दटावणीच्या सुरात बोलत असते.

बिचारा जावेद हिरमुसून, एकदम गप्प होतो. मावशीच्या बोलण्यानं तो दुखावतो. त्याच्या डोळ्यातली नेहमीची चमक पार हरवते. तुझ्या हे लक्षात येतं. मग थोड्या समजावणीच्या सुरात तू त्याला सांगू लागतेस, ''कोणत्याही चांगल्या कामाला हातभार लावणं, ही आपल्याकडची परंपराच आहे. फार पूर्वीपासून आपण हे करत आलेलो आहोत.''

तरीही, हिरमुसला जावेद आपल्याकडे वळूनसुद्धा पाहत नाही.

१८५७च्या, गदरच्या संग्रामापूर्वी आरा गावामध्ये धरमनबीबी नावाची एक तवायफ राहायची. 'तवायफ' हा शब्द तू कुजबुजत, चोरट्या स्वरात उच्चारतेस. तिऱ्हाइतांसमोर तू नेहमी हे असंच तर करतेस. खरं तर रमेशनं, निघाल्यापासून सबंध प्रवासात, गाडीत अनुप जलोटाची भजनं इतक्या मोठ्या आवाजात लावली होती, की त्या गोंगाटात त्याला तुझं बोलणं ऐकू जाणं दुरपास्तच होतं, त्यामुळे त्याची काळजी करण्याचं काहीच कारण नव्हतं.

'धरमनबीबी ही आमची नाव घेण्याजोगी अशी पहिलीच, सुविख्यात पूर्वज. माझ्या आईनं मला तिच्याबद्दल सांगितलं आणि माझ्या आईला तिच्या आईनं. उंचनिंच आणि लवचीक बांध्याची धरमनबीबी, ताकदीनं पंचक्रोशीतल्या कोणत्याही पुरुषापेक्षा कमी नव्हती. तिच्या केशसंभाराची स्पर्धा प्रेमिकांच्या विरहाच्या रात्रीच्या घनदाट आणि प्रदीर्घ काळोखाशीच होऊ शकते, तर तिच्या चेहऱ्यावरचा तजेला विरहोत्तर मिलनाच्या पहाटेसारखा टवटवीत! कमनीय बांध्याच्या धरमनबीबीच्या छातीचा आणि नितंबांचा उभार तिच्या निमुळत्या कमरेमुळं उठून दिसत असे. अशा धरमनबीबीकडे पाहून एखादा फकीर संन्यासीही आपली वाट चुकला असता, तर नवल नाही! धरमनबीबी तलवारबाजीत निपुण. तलवारीवरची पकड तर इतकी सहजस्वाभाविक, की जणू आपल्या प्रेमिकाला ती प्रेमानं कुरवाळतेय. घोडेस्वारीत तर ती इतकी पटाईत, की घोड्याच्या पाठीवर खोगीर नसलं, तरी तिची

मांड ढिली पडत नसे. शहाबादमधल्या कोणत्याही कुस्तीगीराशी दोन हात करायला ती सज्ज असायची. अशा द्वंद्वासाठी ती त्यांना कधीही, सहज आव्हान देऊ शकायची आणि द्यायचीही.

बिहारच्या नकाशावरून शहाबाद केव्हाच पुसलं गेलं. आता उरल्या आहेत त्या स्वातंत्र्योत्तरी दशकातल्या शहाबादच्या काही आठवणी फक्त! कैमूर, रोहतास आणि भोजपूर अशा काही लहान लहान जिल्ह्यांत ते विभागलं गेलंय. त्याआधी उत्तर गंगेची जलोढ मैदानं, बंगाल आणि पूर्वेकडचा काही भाग यामधला पट्टा म्हणजे शहाबाद होतं. त्याच्या विशिष्ट भौगोलिक स्थानानंच शहाबादचा इतिहास घडवला! शहाबादच्या परिसरात सैन्यदलातले लोक, तसंच अनेक घुसखोर, बंडखोरही येता-जाता काही काळ तळ ठोकून असायचे. या प्रदेशावर ज्या काळात ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल होता तेव्हाची ही गोष्ट! कैमूरच्या खडकाळ टेकड्या त्या वेळी शहाबादच्या नैर्ऋत्य सीमेवर होत्या. आणि आराच्या सभोवतालचा गंगा नदीचा जलोढ प्रदेश हा उत्तरेला आणि ईशान्येला पसरलेला होता. आराखेरीज सासाराम, बक्सर आणि डुमरा ही जिल्ह्याची प्रमुख गावं होती.

बुलंद, दमदार आवाजात गाणारी धरमनबीबी तिच्या नृत्य आणि गाननिपुणतेमुळे आरा आणि आसपासच्या परिसरातही उत्तम गायिका आणि नर्तिका म्हणून प्रसिद्ध होती. असं म्हणतात, की ती संपूर्ण दिवस आणि रात्रभर गायली, तरी तिचा आवाज थकायचा नाही. किंबहुना दिवस सरेल तसे तिचे सूर अधिकच धारदार लागत असत. या गायनात खंड असे तो दिवसातून तीन वेळा; पाच मिनिटं ती नमाज पढायची, तेवढाच. मग ते गायन तिच्या घरात असो वा एखाद्या राजदरबारात! नमाजात कधी खंड पडला नाही.

बोलता बोलता, एक क्षणभर थांबून तू तुझ्या पानाची पिचकारी बाहेर टाकतेस. अर्थात आधीच अशा लाल डागांनी रंगलेल्या टॅक्सीच्या रंगात ही भर पडते इतकंच. मी रमेशकडे पाहते, तर तो तुझीच री ओढत, पचकन बाहेर पान थुंकत, त्यात भरच टाकतो! या प्रकारानंतरचे माझे टीकाकटाक्ष तुझ्या लक्षातही येत नाहीत म्हणा! तू शांतपणानं आपलं कित्येक वर्ष जुनं, ॲल्युमिनियमचं, पोचे पडलेलं आणि कायम तुझ्यासोबत असलेलं पानदान काढून, नवं पान जुळवायला घेतेस. या पानदानाच्या छोट्या कप्प्यांमध्ये लाल ओलसर कपड्यात गुंडाळलेली हिरवी पानं, चुना, कात, तसंच कतरी

किंवा अख्खी सुपारी, छोटे किंवा मोठे हिरवे वेलदोडे आणि भाजलेली तंबाखू, इतका सगळा माल असतो. तू सराईतपणे एक ताजं पान काढतेस, त्यावर चुना आणि कात लेपतेस आणि या हिरव्या, किरमिजी आणि पांढऱ्या रंगांच्या पॅलेटवर थोडी सुपारी, दोन वेलदोडे आणि चिमूटभर तंबाखू घालतेस.

गेले दोन दिवस कैमूरमधल्या या छोट्या भभुआ गावात आपण आहोत. आपले शेवटचे दिवस मोजत असलेल्या तुझ्या आजारी मावशीला भेटायला तू तुझ्या मूळ गावी आलीयेस आणि तुझ्या या गावाबद्दल आणि कुटुंबाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी मी तुझ्याबरोबर! मावशीच्या घरातल्या मृत्यूच्या सावटापासून मला काही काळ दूर न्यावं म्हणून, स्थलदर्शनाच्या निमित्तानं इथलं मुंडेश्वरीचं प्रसिद्ध देऊळ बघण्यासाठी तू मला बाहेर घेऊन आलीयेस. कैमूरमधल्या अत्यंत पुरातन देवळांपैकी हे एक असं मानतात. हे देऊळ ही कैमूरची खास ओळख सांगणारं एक महत्त्वाचं ठिकाण! भभुआपासून हे पंधरा किलोमीटर अंतरावर आहे. भोजपुरी चित्रपटातले दोन मोठे अभिनेते, मनोज तिवारी आणि रवी किशन हे त्यांचा कुठलाही चित्रपट प्रदर्शित होण्याआधी मुंडेश्वरी देवीचा आशीर्वाद घेण्यासाठी इथं आवर्जून येतात, ही अत्यंत महत्त्वाची बातमी सांगून, जावेदनं देवळात जायच्या आधीच देवळाचं आणि आपलं स्वतःचंही महत्त्व वाढवून ठेवलंय! या सगळ्या रंजक कथनात भर म्हणून की काय त्यानं हेही सांगितलं, की या देवळाच्या आसपास रानटी वनचर आणि आदिम, अदृश्य अशा पिशाच आदी शक्ती दबा धरून बसलेल्या असतात.

◆

**श्रद्धांजली**

भारताचे चौदावे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबर, २०२४ रोजी वयाच्या ९२व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून त्यांनी केलेलं काम लोकांच्या आजही स्मरणात आहे. पंतप्रधान म्हणून सलग दोन कार्यकाळ त्यांनी पूर्ण केले.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

**१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, २०२५ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचावर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत.**

**१६ जानेवारी-नानी पालखीवाला यांचा जन्मदिन.**

'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ५९२/-**

---

**१६ जानेवारी-मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन.**

'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन.**

'कांगारू देशीच्या गोष्टी'(४ पुस्तकांचा संच)या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१९ जानेवारी-अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन.**

'रेड टेप'या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२१ जानेवारी-डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन.**

'पूजाघर','काया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२१ जानेवारी-पॉल ॲलन यांचा जन्मदिन.**

'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२१ जानेवारी-रमेश जोशी यांचा जन्मदिन.**

'अंतर्नाद' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत २०८/-**

**२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन**

'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**२३ जानेवारी-नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती.**

'नेताजी','नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६३५/- । सवलत किंमत ४७६/-**

**२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिवस**

'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६०९/-**

**२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस**

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-**

**२३ जानेवारी - चार्ल्स ग्लास यांचा जन्मदिन**

'ते एकाकी लढले' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन**

'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२५ जानेवारी - अश्विन सांघी यांचा जन्मदिन**

'दि व्हॉल्ट ऑफ विष्णू', 'दि रोझाबल लाइन', 'द कृष्णा की', 'सियालकोट गाथा', 'माझदाचे जादूगार', 'कालचक्राचे रक्षक', 'चाणक्याचा मंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९८९/- । सवलत किंमत ३१५१/-**

**२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन**

'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला

भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४६६०/- । सवलत किंमत ३०३०/-**

**२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस**

'लेडिज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-**

**२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन**

'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २८०/-**

**२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन**

'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

**२८जानेवारी-डॉ.अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस**

'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझेन्टेशन स्किल्स','जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-**

**२८ जानेवारी-डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन**

'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**३०जानेवारी-पिंकी विराणी यांचा जन्मदिवस**

'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ९५५/- । सवलत किंमत ६६९/-**

**खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१ फेब्रुवारी-सोफी लगूना यांचा जन्मदिन**

'वन फुट रॉंग' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस**

'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच ॲन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-**

**३ फेब्रुवारी-दीप्ती नवल यांचा जन्मदिन**

'द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!'या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस**

'गर्भसंस्कार','स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २३५/-**

**४ फेब्रुवारी-फेसबुक डे**

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस.**

'आकाशवेध','जन्मठेप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत १८९/-**

**८ फेब्रुवारी-जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस.**

'अ टाइम टु किल,''द असोशिएट','द चेम्बर','द क्लायंट','द फर्म','द पेलिकन ब्रीफ','द रेनमेकर','द पार्टनर','द रनअवे ज्यूरी','द लास्ट ज्यूरर','द टेस्टामेंट', 'द स्ट्रीट लॉयर','द ब्रोकर','द इनोसंट मॅन','द रॅकेटिअर', 'सिकॅमोर रो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७७४९/- । सवलत किंमत ४०१३/-**

**८ फेब्रुवारी-अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन**

'पटना ब्लूज' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**१० फेब्रुवारी-अजित जाधव यांचा जन्मदिन**

'वास्तु-अजित' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३७९/-**

---

**१० फेब्रुवारी-राधिका टिपरे यांचा जन्मदिन**

'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-**

---

**११ फेब्रुवारी-स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस.**

'फिश!','फिश! फॉर लाइफ','फिश! स्टीक्स','फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९०/-**

---

**११ फेब्रुवारी-सिडनी शेल्डन यांचा जन्मदिन**

'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

---

**१२ फेब्रुवारी-दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन**

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०७/-**

---

**१२ फेब्रुवारी-वैदेही यांचा जन्मदिन**

'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**१२ फेब्रुवारी-राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन**

'कहाणी पहिल्या आगीनगाडीची', 'इंडियाज रेल्वेमॅन' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४७७/-**

---

**१३ फेब्रुवारी-कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन**

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-**

---

**१४ फेब्रुवारी-व्हॅलेंटाइन डे**

**संच १**-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी','प्रेमाची परिभाषा','अनादि-अनंत','अद्वैत','आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद','चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग–१ आणि भाग-२' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास', 'टू सर विथ लव्ह' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५०/- । सवलत किंमत २८९३/-**

**संच २ –**'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १४०७/-**

◆


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब ३४ व ३५ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

आवर्जून वाचावे असे काही

TBC-34 Book No. 6




ebook available

मास्टर स्टोरी टेलर
जेफ्री आर्चर यांची
विल्यम वॉरिक
मालिकेतील नवी
अफलातून कादंबरी...

## हिडन इन प्लेन साइट

लेखक : जेफ्री आर्चर
अनुवाद : सविता दामले

अनुवादित कादंबरी

TBC-35 Book No. 1




ebook available

लाखो लोकांना मारण्याची आखली घातक योजना...
तिच्या तपासाची रंगलेली उत्कंठावर्धक कथा

लेखक : रॉबिन कुक
अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर

अनुवादित कादंबरी

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada,
CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/01/2025
Posting Date : 11/01/2025

रौप्यमहोत्सवी वर्ष

# नवीन प्रकाशित...



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,